मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले




। मुख्य संपादक - भारती आमले । उपसंपादक - श्री विलास गायकवाड । कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे । निवासी संपादक - श्री राकेश पाटील । सह संपादक - श्री मुकुंद कांबळे । महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : 3 ■ अंक : ८२ ■ रविवार, ३० नोव्हेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## पैठण नगरपरिषद निवडणूक प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पैठण :** नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या आदेशान्वये भारतीय जनता पार्टीकडून काल पैठण शहरात प्रचाराचा जोरदार धडाका देण्यात आला. नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि उमेदवारांना मिळालेला सकारात्मक प्रतिसाद यामुळे संपूर्ण परिसरात निवडणुकीची रंगत चढली आहे.नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ. मोहिनी सुरज लोळगे, तसेच प्रभाग क्र. 9 चे उमेदवार सौ. सुवर्णा अनिल सुराशे आणि श्री. सचिन रामकृष्ण काळे यांच्या प्रचारार्थ विविध ठिकाणी कॉर्नर सभा घेण्यात आल्या. प्रत्येक सभेत उमेदवारांनी आपला विकासदृष्टिकोन मांडत नागरिकांशी संवाद साधला.यानंतर कार्यकर्त्यांसह घरोघरी जाऊन नागरिकांच्या भेटी घेण्यात आल्या, त्यांच्या अडचणी जाणून घेऊन समाधानकारी उपाययोजनांची माहिती देण्यात आली. पक्षाच्या विकासाभिमुख भूमिकेबद्दल मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली.



या प्रचार यात्रेमध्ये छत्रपती संभाजीनगर गारखेडा मंडळाचे अनेक पदाधिकारी विशेषत्वाने उपस्थित होते —श्री. संजय बोराडे (गारखेडा मंडळ अध्यक्ष), श्री. किरण राऊत (महामंत्री), श्री. आसाराम विरकर (कोषाध्यक्ष), श्री. संतोष पाटेकर (उपाध्यक्ष), श्री. रघुनाथ चन्ने, श्री. नारायण सोनवणे, श्री. गोविंद गायकवाड — तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी साथ लाभली.नागरिकांकडून मिळत असलेला भरघोस प्रतिसाद पाहता पैठण नगरपरिषदेत कमळाचा विजय निश्चित असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.विकासासाठी, स्थिर नेतृत्वासाठी… कमळाच्या बटनावर टिचकी मारा, असे आवाहन पदाधिकारी व उमेदवारांनी यावेळी केले.

# मुंबईत वाढत्या हवेच्या प्रदूषणाविरोधात आज आंदोलन

**मुंबई :** शहरातील वाढत्या हवेच्या प्रदूषणाविरोधात नागरिकांनी एकत्र येण्याचे ठरवले असून रविवारी वांद्रे पश्चिम येथील कार्टर रोड प्रॉमेनेडवर हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. आंदोलन दुपारी ३.३० ते संध्याकाळी ५ या वेळेत स्केटबोर्डिंग पार्कजवळ होणार आहे.

मुंबईची हवा दिवसेंदिवस दूषित होत असून त्यास विरोध करण्यासाठी नागरिकांकडून शांततामय पद्धतीने आंदोलन केले जाणार आहे. आयोजकांनी सर्वांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबईच्या हवेचा दर्जा खालावला आहे. अनेक भागात




वाईट हवा नोंदली जात आहे. परिणामी मुंबईकरांना सध्या अशुद्ध हवेचा सामना करावा लागत आहे.

समीर ॲपच्या नोंदीनुसार, शनिवारी मुंबईचा सरासरी हवा निर्देशांक १२० इतका होता. म्हणजेच मुंबईची हवा 'मध्यम' श्रेणीत नोंदली गेली. त्यात कुलाबा येथील हवा निर्देशांक ६८, मालाड ९१, मुलुंड ६६, पवई ७६ आणि शीव येथे ६१ इतका हवा निर्देशांक होता. म्हणजेच येथील हवा 'समाधानकारक' श्रेणीत नोंदली गेली. त्याचबरोबर भायखळा, चेंबूर, देवनार, विलेपार्ले, शिवडी या भागातील हवा 'मध्यम' श्रेणीत नोंदली गेली. तेथील हवा निर्देशांक अनुक्रमे १५४, १४५, १५८, १२६ आणि ११७ इतका होता.

**मुंबईतील प्रदूषण का वाढते ?**

गेल्या दोन – तीन वर्षांपासून मुंबईतील प्रदूषणाचे प्रमाण वाढत असल्याचे विविध संस्थांनी सादर केलेल्या अहवालांतून निदर्शनास आले आहे. दरवर्षी साधारण थंडीची चाहूल लागताच मुंबईच्या हवेचा दर्जाही ढासळू लागतो. गेल्या वर्षी (२०२४) नोव्हेंबर – डिसेंबरमध्ये मुंबईच्या हवेची स्थिती वाईट झाली होती. ती अगदी फेब्रुवारी अखेरपर्यंत वाईट होती.

मुंबईतील प्रदूषणात नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणांमुळे भर पडत आहे. अनेक ठिकाणी पायाभूत सुविधा, निवासी – व्यावसायिक संकुले, नव्या प्रकल्पांचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. त्यामुळे उडणारी धूळ हवेचा दर्जा ढासळण्यास कारणीभूत ठरत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदवले आहे. त्याचप्रमाणे वाहनांतून बाहेर पडणाऱ्या धुरांमध्ये अति-अतिसूक्ष्म काजळीसारखे कण असतात. यामुळे प्रदूषण वाढत आहे.

## लायन्स हेल्थ फाऊंडेशन आणि ग्रामपंचायत निलज यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्य मंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत मोफत नेत्र चिकित्सा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**बोरघर / माणगाव ( विश्वास गायकवाड ) :** लायन्स क्लब ऑफ माणगाव, लायन्स हेल्थ फाउंडेशन आणि ग्रामपंचायत निलज यांचे संयुन्त विद्यमाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय निलज येथे शुक्रवार दिनांक २८/११/२०२५ रोजी मोफत नेत्र चिकित्सा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते.सदर शिबिरात रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली




तसेच मोतीबिंदू रुग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येतील. या कार्यक्रमासाठी ,लायन्स क्लब ऑफ माणगाव चे अध्यक्ष संदीप नागे, क्लब, मेम्बरशिप चेअर पर्सन लायन सुरेशजी मोहिते, डायरेक्टर संतोष नागे, विशाल जाधव, कृषी अधिकारी लायन्स हेल्थ फाउंडेशन चे निलेशजी म्हात्रे, तेरणा हॉस्पिटल चे राम महाडिक, प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर येथील आरोग्य सेवक सुधीर खैरे, यांनी सदरील शिबिरामध्ये अनमोल योगदान दिले.सी. एन. मोरे आरोग्य सेविका प्राथमिक शिक्षक, अंगणवाडी ताई तसेच ग्रामपंचायत निलज विभागातील ग्रामस्थ आणी रुग्ण मोठया संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे व्यवस्थापक ग्रामपंचायत निलज सीमा काकडे प्रशासक आणि सारिका सायगावकर, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत निलज अशोक सोंडकर यांनी चहा, नास्ता, जेवण दिले.

# घटनाकार बाबासाहेबांना महेंद्रशेठ घरत यांनी केले महाडमध्ये अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहिताना सांगोपांग विचार केला. अठरापगड जाती-जमातींतील उपेक्षितांना सन्मानाने जगता यावे, यासाठी घटनेत हेतुपुरस्सर काही कलमांचा आवर्जून समावेश केला, त्यामुळे बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान निश्चितच महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे त्यांना अभिवादन करणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी महाड येथे बाबासाहेबांना अभिवादन करताना



म्हणाले.

भारताची सध्याची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती पाहाता येथील सर्वसामान्यांना आपल्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी संविधान जनतेत रुजवणे गरजेचे आहे. या विचारानेच संविधान दिनानिमित्त शिवशंभू स्वराज्य मोहीम राबवण्यात आली. यावेळी चवदार तळ्यावर बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदनाही देण्यात आली.

या मोहिमेला वारकरी आणि सर्वसामान्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

यावेळी काँग्रेसच्या रायगडच्या प्रभारी श्रीमती राणीताई अग्रवाल, सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन उपस्थित होत्या. तसेच एम. जी. ग्रुपचे सहकारीही आवर्जून उपस्थित होते.

## महेंद्रशेठ घरत यांची महाडमध्ये 'भेल पे' चर्चा

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** महाड नगरपरिषद निवडणुकीत उभ्या असलेल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी महेंद्रशेठ घरत यांनी महाडमध्ये 25 व 26 नोव्हेंबरला मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी तेथील नागरिकांचा कॉंग्रेसकडे ओढा असल्याचे दिसून आले. कॉंग्रेस हा सर्वसामान्यांचा पक्ष आहे, असे त्यांनी मतदारांना पटवून दिले. त्यानंतर त्यांनी चक्क भेल पुरीच्या स्टॉलवर आपला मोर्चा वळवला. तेथे भेल पुरीचा आस्वाद घेत मतदारांशी संवाद साधला. त्यामुळे महाडमधील




मतदारांमध्ये महेंद्रशेठ घरत यांचीच चर्चा सुरू होती. त्यामुळे महाडमधील नगर परिषदचे कॉंग्रेसचे उमेदवार चांगल्या मतांनी विजयी होतील, असे चित्र दिसत आहे.यावेळी कॉंग्रेसचे महाडमधील नगर परिषदचे उमेदवार, रायगडच्या प्रभारी श्रीमती राणीताई अग्रवाल, मिलिंद पाडगावकर आणि एम. जी. ग्रुपचे सहकारी उपस्थित होते.

## धनादेश वटला नाही म्हणून आरोपीस 1 महिना शिक्षा व रु 123000 दंड

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** अहिल्यानगर येथील मे राजन ट्रेडर्स यांचे कडून आरडगाव ता. राहुरी येथील हॉटेल माथेरान चे मालक जितेंद्र नामदेव झुगे यांने उधारीवर विदेशी दारूची वेळोवेळी खरेदी केली होती. थकीत उधारीचे बाकी पोटी आरोपी यांने राजन ट्रेडर्स चे प्रोप्रायटर रमेश शिवराम सातपुते यांना धनादेश दिला होता.

आरोपीने दिलेला धनादेश वटला नाही फिर्यादी यांनी अहमदनगर येथील चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब यांचे कोर्टात निगोशिएबल इंस्ट्रूमेंट्स ॲक्ट चे कलम 138 प्रमाणे फिर्याद दाखल केली. सदर केस ची पुढील सुनावणी अतिरिक्तमुख्य न्यायदंडाधिकारी श्री डी डी कर्वे साहेब यांचे समोर झाली. फिर्यादी कडून प्रोप्रायटर रमेश शिवराम सातपुते यांची साक्ष नोंदविण्यात आली. तसेच अवश्यक तो कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आला. फिर्यादिची गुणदोषावर सुनावणी होऊन आरोपी जितेंद्र नामदेव झुगे यास दोषी धरून त्याला परक्राम्य संलेख अधिनियम 1881 चे कलम 138 मध्ये दोषी धरून एक महिन्याची साधी कैद व रुपये एक लाख तेवीस हजार दंड अशी शिक्षा दिली आहे. तसेच दंड न भरल्यास पंधरा दिवस साधी कैद देण्यात आली आहे. आरोपीने दंडाची रक्कम कलम फिर्यादीस एक महिन्याच्या आत द्यावेत असा आदेश करण्यात आला आहे. फिर्यादी कडून व्यवस्थापक रमेश शिवराम सातपुते यांची साक्ष ग्राह्य धरण्यात आली. संस्थेकडून ॲड शिवाजी अण्णा कराळे , ॲड करुणा रामदास शिंदे व ॲड सत्यजीत शिवाजी कराळे ॲड. मोनाली बन्सी कराळे यांनी कामकाज पाहिले.

## पवनी न्यायालयाचा निर्वाळा अष्छिल शिवीगाळ, धमकी व मारपीट प्रकरणात 3 आरोपी यांना प्रत्येकी 1000 रुपये द्रव्यदंडाची शिक्षा

**दैनिक युवक आधार**

**भंडारा (संजीव भांबोरे) :** जिल्ह्यातील पोलीस स्टेशन अड्याळ हद्दीतील ग्राम कोसरा येथील फिर्यादी नामे योगिता हेमंत माकडे वय 30 वर्षे राहणार कोसरा यांनी दिनांक 1 ऑक्टोंबर 2017 रोजी घराचे अंगणाचे वादावरून झगडा भांडण तसेच अश्छिल भाषेत शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मार्केट केली व जीवे मारण्याची धमकी दिली याबाबत आरोपी नामे प्रणित वसंता माकडे वय 29 वर्षे, अमोल वसंता माकडे वय 18 वर्षे , सत्यशोभा वसंता माकडे वय 46 वर्षे राहणार कोसरा ,यांच्याविरुद्ध तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन अड्याळ येथे अपराध क्रमांक 181/ 2017 कलम 294 ,323 ,504 ,506 ,34 भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला .सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार विकास जाधव बक्कल नंबर. 758 यांनी




करून आरोपी विरुद्ध पुरावे गोळा करून दोषारोप पत्र पवनी न्यायालयात दाखल केले. पुराव्यावरून पवनी न्यायालयाचे न्यायाधीश श्री ए व्हि पंडित यांनी कलम 248,( 2) सी आर पी सी अन्वये दिनांक 27 नोवेंबर 2025 रोजी तिन्ही आरोपी यांना प्रत्येकी 1000 हजार रुपये द्रव्यदंडाची शिक्षा ठोकवली. सरकारी पक्षाकडून सहाय्यक सरकारी अभियोगता कुमारी पुनम बी नवनागे यांनी बाजू मांडली .तर पोलीस शिपाई नितीन मेश्राम बक्कल नंबर 1580 यांनी कोर्ट पैरवी केली




## समाज कार्य हे मॉर्निंग कट्ट्याचे ध्येय – प्रा. डॉ. साहेबराव ओहोळ

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर**

**उरण :** मॉर्निंग कट्टा विमला तलाव उरण या ग्रुप तर्फे शुक्रवार २८ नोव्हेंबर रोजी आदिवासी निवासी आश्रम शाळा चिरनेर येथे एक स्टील कपाट आणि ब्लॅक बोर्ड देणगी स्वरूपात सुपूर्त करण्यात आले. सदर कार्यकर्माचे प्रास्तविक शाळेतील शिक्षिका श्रीमती साधना शिंदे यांनी केले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रोफेसर डॉ साहेबराव ओहोळ रिटायर्ड प्रिन्सिपॉल फुंडे कॉलेज



यांनी भूषविले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की गेले १०-१५ वर्षांपासून मोर्निंग वॉक ग्रुप अस्तित्वात आला असून या ग्रुप मार्फत अनेक सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. आज आश्रम शाळेला त्यांच्या गरजेनुसार एक लोखंडी कपाट व ब्लॅक बोर्ड ग्रुपच्या निधीतून देण्यात आले. या ग्रुपचे सामाजिक कार्य हे देखील ध्येय आहे असे त्यांनी अभिमानाने सांगितले. असेच उपक्रम भविष्यात देखील राबविले जातील असे सांगितले. श्री प्रवीण म्हात्रे यांनी ग्रुपने आजपर्यंत केलेल्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. सर्व सभासदांच्या संमतीने असे उपक्रम घेतले जातात. सर्व सभासद प्रत्येक महिन्याला स्वच्छेने ठराविक रक्कम जमा करून त्यातून असे उपक्रम राबवतात. श्री गणेश पाटील, श्री अशोक म्हात्रे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमास श्री देवचंद कोळी, श्री अभय वेदपाठक, शाळेतील शिक्षक आणि सर्व विध्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सर्व मॉर्निंग कट्टा ग्रुपच्या सभासदांचे योगदान लाभलेले आहे. या ग्रुप मध्ये ३५-४०लोक व्यायाम व इतर एक्सरसाईज करण्यासाठी न चुकता एकत्रित येत असतात.

## दुधा येथे नवोदय सराव परीक्षा उत्साहात; 400 विद्यार्थ्यांचा सहभाग



**दैनिक युवक आधार**
**राजू शिंदे उप संपादक**

**महाराष्ट्र :** जवाहरलाल नवोदय विद्यालयाच्या परीक्षेची वेळ जवळ आली असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा सुलभ व्हावी यासाठी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथिल शिक्षकांनी पालकांनी व गावातील नागरिकांनी सराव परीक्षेच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेचे २९ नोव्हेंबर रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी जालना, बुलढाणा, परभणी सह विविध जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी परीक्षेस सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मंठा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण, विस्तार अधिकारी के.जी.राठोड, संतोष गिऱ्हे, अभिमान बायस, यांच्या मार्गदर्शनाखाली व केंद्र प्रमुख एल. जे. खरात यांच्या संकल्पनेतून मुख्याध्यापक विजय कांगणे, सह शिक्षक निलेश पिसे, पंजाबराव दांदडे यांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या व ग्राम पंचायतीच्या मदतीने पुढाकार घेऊन नवोदय परीक्षेच्या स्पर्धा परीक्षेचे२९ नोव्हेंबर रोजी आयोजन केले होते. यावेळी विविध तालुक्यातून व जिल्हातून 400विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेत श्रेणी नुसार बक्षिसांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुषंगाने प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांना स्कूलबॅग व इतर विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर १२ बक्षिसांचे वाटप करण्यात आले .या मध्ये तेजश्री नारायण सस्ते मनीष शंकर मरकड प्रज्वल गणेश सुरुशे ज्ञानेश्वर बाळासाहेब काकडे सोहम भाऊसाहेब बहिर अनिकेत भागवत देशमुख निरंजन महादेव बोचरे श्रावणी भगवान मरळ नैतिक चेनसिंग घुनत कार्तिक राजू दिवटे आर्यन राजू चव्हाण कैवल्य संदीप जैन सूरज लक्ष्मण सोळुंके स्वराज कृष्णा डोंगरे श्रेया वैभव नागवे यांना मान्यवरांच्या शाळा व्यवस्थापन समिती ग्रामपंचायत यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले .

# सणसर गावात तुकाराम पालखी महामार्गाचे काम अर्धवट

## अपघातात किती बळी गेल्यावर महामार्ग पूर्ण होणार

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील भवानीनगर ते सणसर गावात चालू असलेल्या श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम अर्धवट राहिले असून सध्या या भागातून ऊस वाहतूक करणारे वाहने मोठ्या प्रमाणात सुरु होऊन रस्त्याच्या अर्धवट कामामुळे वाहन चालक संताप व्यक्त करत आहेत. गेले तीन ते चार वर्षे वाहनचालक हा त्रास सहन करत असल्याने या ठिकाणी खूप मोठया प्रमाणात अपघात होऊन दुर्घटना घडल्या आहेत काही अपघातात परिसरातील तरुण युवकांना कायमचे अपंगत्व आले असल्यामुळे कुटुंबाचे फार मोठया प्रमाणात मानसिक,आर्थिक नुकसान झाले असून त्याला जबाबदार कोण? असा सवाल स्थानिक नागरिक करत आहेत.गेली तीन वर्ष झाली तरी पालखी महामार्गाचे काम रखडलेले आहे.त्यातच सणसर येथील ओढ्याच्या खालील बाजूस रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. सध्या श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचा ऊस गळीत हंगाम सुरू असल्याने याच अरुंद रस्त्यावरून ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर आणि इतर वाहनांची मोठी वर्दळ सुरू असून एका आठवड्यात दोन तीन ट्रेलर पलटी होऊन शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होऊन सामोरे जावे लागत आहे मात्र आजपर्यंत ठेकेदार व रस्ते विकास महामंडळाला जाग आलेली नाही.खड्ड्यात एखाद्याचा अपघात होऊन जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार आहे का? असा संतप्त सवाल सणसर येथील वाहनचालक व नागरिक करत आहेत.



सणसर येथील पालखी महामार्गचे काम लवकरात लवकर पूर्ण करून द्यावे म्हणून सणसर ग्रामपंचायतीने पंढरपूर येथील कार्यालयास वेळोवेळी पत्रव्यवहार केला असून सुद्धा तेथील अधिकारी व काम करत असलेला ठेकेदार योग्य नोंद घेऊन काम पूर्ण करत नसल्याने शुक्रवार दि 28 नोव्हेंबर रोजी विशेष ग्रामसभा घेतली त्यावेळी सणसर गावाच्या वतीने ग्रामस्थ लवकरच रास्तारोको करून प्रशासनाला जाग आणुन देण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहिती सरपंच यशवंत नरुटे पाटील यांनी सांगितले.

रस्त्याचे काम अर्धवट झाले असल्यामुळे रस्त्याच्या धुळीचा इतका परिणाम सणसर बसस्थानक येथील बाजारपेठ मधील स्थानिक दुकानदार यांना बसत आहे की आपली दुकाने काम पूर्ण होत नाही तोपर्यंत बंद करून ठेवावीत असं वाटायला लागलं आहे.यावर उपाय म्हणून संबधीत ठेकेदार याने दिवसातून किमान चार वेळा तरी पाणी मारणे गरजेचं असून सुद्धा ठेकेदार याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक मेडिकल दुकानदार हनुमंत कदम यांनी केला आहे.

## शिक्षक पात्रता परीक्षा (TET) निर्णयावर पुनर्विचारासाठी हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनकडून राष्ट्रपती आणि पंतप्रधानांना हस्तक्षेप करण्याची मागणी



**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर:** देशभरातील प्राथमिक शिक्षक व बेरोजगार युवकांच्या हितासाठी हॅपी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम सर यांनी दिल्लीत जाऊन देशाच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू मॅम आणि देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी जी यांना सविस्तर निवेदन देत शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अनिवार्य करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने 01 सप्टेंबर 2025 रोजी दिलेल्या निर्णयावर तातडीने पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे.या निवेदनात म्हटले आहे की सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा परिणाम फक्त नव्या भरतीवरच नव्हे तर सध्या कार्यरत असलेल्या त्या सर्व प्राथमिक शिक्षकांवरही होणार आहे, ज्यांची सेवा पाच वर्षांहून अधिक बाकी आहे. प्रमोशनसह सर्व शैक्षणिक प्रक्रियांमध्ये TET अनिवार्य करण्याच्या निर्णयामुळे लाखो शिक्षकांच्या करिअरवर धोका निर्माण झाला आहे. शेख अब्दुल रहीम यांनी स्पष्ट केले की देशभरात मोठ्या संख्येने असे शिक्षक कार्यरत आहेत ज्यांनी B.Ed., D.El. Ed., BTC इत्यादी अभ्यासक्रम पूर्ण करून त्या काळच्या वैध नियमांनुसार नियुक्ती मिळवली आहे आणि अनेक वर्षे निष्ठेने काम करत आहेत. अचानक TET ची सक्ती लागू केल्याने त्यांच्या संपूर्ण भविष्यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. यात बहुसंख्य शिक्षक ग्रामीण, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व SC/ST/OBC घटकांतील असल्याचे त्यांनी नमूद केले.

"दिल्ली दौरा यशस्वी ठरला, मा.राष्ट्रपती महोदया आणि मा.प्रधानमंत्री यांचे कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन निवेदन व चर्चा केली, पंतप्रधान या जनहिताच्या मुद्द्यावर हस्तक्षेप करून लाखो शिक्षक व युवकांचे भविष्य सुरक्षित करतील अशी मला अपेक्षा आहे"
शेख अब्दुल रहीम
संस्थापक अध्यक्षः हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन
राज्य प्रवक्ताः महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन

निवेदनात या बाबीचीही नोंद करण्यात आली आहे की सर्वोच्च न्यायालयाने आपल्या पूर्वीच्या अनेक निर्णयांमध्ये स्पष्ट केले आहे की "भरती प्रक्रिया सुरू झाल्यानंतर तिच्या मूलभूत नियमांमध्ये बदल करता येत नाही". तरीही या नव्या निर्णयामुळे लाखो युवकांसमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे.

शेख अब्दुल रहीम यांनी देशाच्या राष्ट्रपती आणि पंतप्रधानांकडे तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत:

1. हा विषय पुन्हा सर्वोच्च न्यायालयासमोर मांडून समीक्षा किंवा क्युरेटिव्ह पिटीशन दाखल करावी.
2. पुनर्विचार प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत या निर्णयाच्या अंमलबजावणीवर अंतरिम स्थगिती द्यावी.
3. TET परीक्षा केवळ नव्या भरतीसाठीच लागू करावी; पूर्व नियुक्त किंवा निवड झालेल्या शिक्षकांवर ती बंधनकारक करू नये.

## धानाची शिल्लक असलेली रक्कम आज पासून देण्यास सुरुवात होणार!



**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे : भंडारा-** आज दिनांक 26 नोव्हेंबर 2025 ला सहाय्यक पणन अधिकारी पंकज काकडे यांच्यासोबत जे शेतकऱ्यांचे ऑगस्ट महिन्याचे धान्याचे चुकारे बाकी होते तर ते मिळण्या संबंधात माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे यांच्यासोबत झालेल्या चर्चेचा पत्रकार संजीव भांबोरे यांनी ग्राउंड रिपोर्ट घेतला. चर्चेअंती त्यांनी सांगितलं की ,आमच्याकडे पैसे जमा आहेत पण तांत्रिक अडचणीमुळे ते पैसे जमा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होऊ शकले नाही .पण दिनांक 26 नोव्हेंबर पासून आम्ही शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे टाकण्यास सुरू केलेली आहे. व दोन-तीन दिवसात सर्व शेतकऱ्यांचे पैसे त्यांच्या खात्यावर जमा होतील अशा प्रकारची आश्वासन सहाय्यक पंकज काकडे यांनी दिलेला आहे .आणि सोबतच ज्या शेतकऱ्यांचे बोनसचे पैसे बॅलन्स होते. जे ब्लॅक लिस्टमध्ये आहेत तर त्या संबंधात सुद्धा शासनाशी पाठपुरावा सुरू आहे. आणि ते सुद्धा ह्या दोन-चार दिवसांमध्ये पैसे येतील अशा प्रकारचे आश्वासन त्यांनी दिले. त्यासोबत आपल्या जिल्ह्यामध्ये आता मक्याचा फार मोठ्या प्रमाणात लागवड सुरू झालेली आहे आणि तो मका सुद्धा शासनाने खरेदी केंद्रावर विकत घ्यावा अशा प्रकारची त्यांना आम्ही मागणी केली मागणीनुसार त्यांनी सांगितलं की, जर शेतकऱ्यांची तशी मागणी असेल तर या उन्हाळ्यामध्ये आम्ही खरेदी केंद्राच्या मार्फत मका सुद्धा खरेदी करू अशा प्रकारचा आश्वासन सहाय्यक डीएमएस भंडारा यांनी दिलेला आहे.




## गडचिरोलीत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे आगमन; हेलिपॅडवर डॉ. अशोकजी नेते यांच्याकडून स्वागत



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू संपादक**

**नागपूर** : गडचिरोली नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रचाराला वेग येत असताना महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय लाडके मुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे आज गडचिरोलीत भव्य आगमन झाले. गडचिरोलीतील पोलिस मुख्यालय कॉम्प्लेक्सच्या ग्राउंडवरील हेलिपॅडवर आगमनानंतर माजी खासदार तथा भाजपा अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांनी पुष्पगुच्छ देऊन मुख्यमंत्री महोदयांचे हार्दिक स्वागत केले. भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार अ‍ॅड. प्रणोती सागर निंबोरकर (भांडेकर) तसेच नगरसेवक उमेदवारांच्या प्रचाराच्या अनुषंगाने मुख्यमंत्री साहेबांचे हे आगमन विशेष महत्त्वाचे ठरले.या स्वागत सोहळ्यात आमदार डॉ. मिलिंद नरोटे,माजी आमदार डॉ. देवरावजी होळी,माजी आमदार डॉ. नामदेवराव उसेंडी,तसेच मोठ्या संख्येने उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला.मुख्यमंत्री महोदयांच्या भेटीमुळे गडचिरोलीतील भाजपाचा उत्साह आणि आत्मविश्वास अधिक वृद्धिंगत झाल्याचे वातावरण जाणवले.

## दादर येथील रस्ते कचरा धूळ आणि कचरा मुक्त



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी मयुर धुरी** : बृहन्मुंबई क्षेत्रातील (मुंबई शहर व उपनगरे) वायू प्रदूषण नियंत्रणाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक २८ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत 'रस्ते स्वच्छता व धूळ नियंत्रण मोहीम' राबविण्यात येत आहे.सर्व प्रशासकीय विभाग (वॉर्ड) स्तरावर कार्यरत असलेल्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कनिष्ठ पर्यवेक्षकांनी दत्तक घेतलेल्या रस्त्यांवर या मोहिमेला आजपासून सुरूवात झाली आहे. स्वच्छ हवेसाठीच्या उपाययोजनांचा भाग म्हणून ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

# महात्मा फुले मंडई मेट्रो स्टेशन नामांतरासाठी माळी महासंघाचे बेमुदत उपोषण सुरु

**आसाराम विरकर**
**संपादक, दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

**पुणे :** ऐतिहासिक व सामाजिक ओळख असलेल्या महात्मा फुले मंडई परिसराचे नाव कायम असतानाही मेट्रो स्टेशनला केवळ 'मंडई मेट्रो स्टेशन' असे नाव देण्यात आले आहे. या निर्णयाचा तीव्र विरोध करत माळी महासंघ पुणे शहर यांनी स्टेशनचे नाव 'महात्मा फुले मंडई मेट्रो स्टेशन' करण्यासाठी बेमुदत उपोषणाला 28 नोव्हेंबरपासून सुरुवात केली आहे.




उपोषण स्थळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला सक्रिय पाठिंबा देत आहेत. महात्मा फुले यांच्या कार्याचा सन्मान राखण्यासाठी स्टेशनचे पूर्ण नाव देणे अत्यावश्यक असल्याची भूमिका संघटनेने स्पष्ट केली.आंदोलकांनी शासनाला इशारा देत सांगितले की,"हे आंदोलन आणखी तीव्र होण्यापूर्वी शासनाने तातडीने योग्य निर्णय घ्यावा. समाजाच्या न्याय्य मागणीचा मान राखावा," असे आवाहन त्यांनी केले.माळी महासंघाने सर्व समाजबांधवांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## महात्मा फुले यांच्या विचारांना कृतीतून आदरांजली; समतेचा दीप अखंड प्रज्वलित ठेवण्याची प्रतिज्ञा" – डॉ. नीलम गोऱ्हे

**दैनिक युवक आधार**

**पुणे / प्रतिनिधी :** फुलेवाडा येथे महात्मा जोतीराव फुले यांच्या १३५व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात संविधान उद्देशिकेचे वाचन, सामाजिक प्रश्नांची जाणीव आणि फुले विचारांचा पुनःस्मरण असा अर्थपूर्ण उपक्रम पार पडला. विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे प्रमुख उपस्थित होत्या.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, "महात्मा फुले यांनी समानतेचा मार्ग दाखवला. त्यांच्या स्मृतिदिनी संविधान उद्देशिकेचे वाचन करून लोकशाहीच्या मूल्यांची पुनःजाणीव करून देत आहोत." त्यांनी सांगितले की २५ नोव्हेंबरपासून सुरू केलेली 'शाखा—तिथे संविधान' मोहीम वर्षभर राबवण्यात येणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाने हा उपक्रम अधिक बळकट झाला आहे.

महिला सुरक्षा, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, आणि तळागाळातील प्रश्नांना निवडणुकीत आवाज देणे हे शिवसेनेचे प्राधान्य असल्याचेही त्यांनी व्यक्त केले. भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाच्या अंतिम टप्प्यातील कामाबद्दल उपस्थित



मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन शहर प्रमुख निलेश गिरमे यांनी केले. महानगर प्रमुख रवींद्र धंगेकर, शिवसेना प्रवक्ते किरण सोनवणे, युवा सेना सचिव किरण साळी, महिला संपर्कप्रमुख सुदर्शना त्रिगुणाईत, युवासेना पदाधिकारी निलेश घारे, जिल्हा प्रमुख सोमनाथ कुटे यांच्यासह विविध पदाधिकारी आणि महिला आघाडीतील कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमात संविधान उद्देशिकेचे वाचन करून लोकशाहीचा संदेश देण्यात आला. दलित समाजाच्या जमिनी, महिलांची सुरक्षा, शेतकऱ्यांच्या अडचणी आणि सामाजिक विषमतेविरुद्ध आगामी अधिवेशनात ठोस आवाज उठवण्याची बांधिलकी डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केली.

# समता पुरस्कार–२०२५ भव्यदिव्य सोहळ्यात वितरित;

## डॉ. सुखदेव थोरात यांना सन्मान

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे :** समता, शिक्षण आणि सामाजिक नवनिर्मितीच्या विचारांना उत्कट सलाम देणारा समता पुरस्कार–२०२५ आज समता भूमी, फुले वाडा, पुणे येथे अत्यंत प्रतिष्ठेने प्रदान करण्यात आला. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने दिला जाणारा हा मानाचा पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ विचारवंत व अर्थतज्ज्ञ मा. डॉ. सुखदेव थोरात यांना मा. उपेंद्र कुशवाह, माजी केंद्रीय मंत्री यांच्या शुभहस्ते बहाल झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आ. पंकज भुजबळ यांनी मनोगतपूर्ण शैलीत सादर केले, तर सन्मानपत्राचे वाचन डॉ. शेफाली भुजबळ यांनी केले. संपूर्ण




सभागृहात गौरव, कृतज्ञता आणि समता चळवळीच्या मूल्यांची सखोल जाणीव दाटून आली होती.

या पुरस्कारामध्ये रु. १ लाख, फुले पगडी, मानपत्र शाल आणि स्मृतीचिन्ह यांचा समावेश असून हा सन्मान क्रांतिसूर्य महात्मा फुले पुण्यतिथीच्या औचित्याने, समता परिषदेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष तसेच राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री मा. छगनराव भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदान करण्यात येतो.

डॉ. थोरात यांनी उत्तरपर भाषणात महात्मा फुले यांच्या सामाजिक क्रांतीचा गौरव करत, "फुले दांपत्यांच्या चळवळीनेच अनेक समाजसुधारक घडले व पुढे ही परंपरा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नवनिर्मितीच्या उच्च शिखरांवर नेली," असे सांगत समता परिषदेच्या कार्याचा विशेष उल्लेख केला.

आपल्या मनोगतात मा. कुशवाह म्हणाले, "सन २००६ पासून भुजबळ साहेबांसोबत ओबीसी समाजाच्या न्यायहक्कांसाठी लढा दिला आहे. देशातील ओबीसी प्रश्नांवर भुजबळ साहेबांचे नेतृत्व दिशादर्शक राहिले असून पुढील प्रवासही त्याच मार्गदर्शनाखाली बळकटपणे सुरू राहील."

कार्यक्रमास राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा मा. रुपालीताई चाकणकर, माजी मंत्री मा. बाळासाहेब शिवरकर, प्रा. लक्ष्मण हाके, प्रदेश कार्याध्यक्ष बापू भुजबळ, सत्संग मुंडे, डॉ. स्नेहा सोनकाटे, विशाखा भुजबळ, डॉ. सुदर्शन घेरडे, यश बोरावके, मंजिरी धाडगे, प्रीतेश गवळी, पंढरीनाथ बनकर, महिला शहर अध्यक्षा वैष्णवी सातव यांच्यासह राज्यभरातील समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.समता विचारांच्या नव्या उर्जेला पेटवणारा हा सोहळा, फुले दांपत्यांच्या परिवर्तनवादी विचारधारेचा सामाजिक अविष्कार ठरला.

## नेवाशात काँग्रेसच्या अल्ताफ पठाणला वाढत्या पाठिंब्यामुळे विजय निश्चित – संभाजी माळवदे

**दैनिक युवक आधार**

**(नेवासा प्रतिनिधी):** - नेवाशात नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे उमेदवार अल्ताफ पठाण यांना जनतेतून सर्वच स्तरातून वाढत्या पाठिंब्यामुळे त्यांचा विजय हा निश्चित आहे असे काँग्रेस अध्यक्ष संभाजी माळवदे यांनी स्पष्ट केले. नेवाशात नगरपंचायत निवडणूक प्रचार शिगेला पोहचला असून नगराध्यक्ष पदासाठी पाच उमेदवार रिंगणात आहे यात काँग्रेसचे अल्ताफ पठाण यांनी सुरुवातीपासून प्रचारात आघाडी घेतली आहे. नेवाशात प्रत्येक कुटुंबाची वैयक्तिक भेट घेऊन त्यांचे प्रश्न समजून घेऊन ते सोडविण्याचे आश्वासन देत पठाण मत मागत आहे. पठाण यांचे सर्व जाती धर्मातील लोकांशी असलेले घरोब्याचे संबंध,प्रश्न कोणाचेही असो लगेच धावून जाणारा माणूस, हाकेला ओ देणारा माणूस अशी ओळख नेवासा शहरात पठाण यांची निर्माण झाली आहे.त्यातच काँग्रेस सारख्या राष्ट्रीय पक्षाची उमेदवारी मिळाल्याने सर्वच जाती धर्मातील लोक पठाण यांच्या पाठीशी उभे राहिले आहे असे चित्र नेवासा शहरात निर्माण झाले आहे. पठाण यांनी त्यांच्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात आपल्या प्रभागात केलेली कामे ही शहरातील जनतेसाठी मॉडेल बनली असून अशीच कामे करणारा नगराध्यक्ष पाहीजे असा सुर आता शहरातील जणतेमधून येत आहे. तर शहरात प्रलंबित असलेले स्वच्छ पाणी पुरवठ्याचा प्रश्न, घरकुलासाठी जागेचे प्रश्न, शहरातील स्वच्छतेचा प्रश्न, सर्वसामाणन्याचे डोल, कुपन, असे प्रश्न नगराध्यक्ष झाल्यास तातडीने सोडविणार असे आवाहन पठाण जनतेला करत आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेचा मतदान करण्यासाठीचा कल पठाण यांच्याकडे वाढला आहे. याशिवाय प्रचाराची धुरा समर्थपणे सांभाळणारे काँग्रेसचे अध्यक्ष संभाजी माळवदे, शहराध्यक्ष अंजुम पटेल, व सर्व काँग्रेस कमिटी पठाण यांच्या प्रचारात खंबीरपणे उभी राहिली आहे. पठाण हे मुस्लिम समाजातील असले तरी शहरातील हिंदू समाज, ख्रिशच्चन समाज देखील पठाण यांच्या पाठीशी उभा राहिल्याचे चित्र आता बघण्यास मिळत आहे. तर काही अपक्ष उमेदवार देखील पठाण यांच्या पाठीशी उभे असल्याचे चित्र बघण्यास मिळत आहे. काँग्रेस अध्यक्ष संभाजी माळवदे यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी एकंदरीत नेवासा शहराच्या निवडणूकिचे चित्र बघता, पठाण यांना जनतेचा वाढता पाठिंबा या सर्व गोष्टीचा विचार केला असता काँग्रेसचे अल्ताफ पठाण हेच पुढील नगराध्यक्ष असतील, त्यासाठी आपले मत वाया जावू न देता पठाण यांना जनतेनी मत द्यावे असे आवाहन माळवदे यानी केले.

## चिखली दुमदुमली महारॅलीने.. नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग, भाजपाच्या उमेदवारांना प्रचंड पाठिंबा.. विरोधकांचे धाबे दनानले..!

**दैनिक युवक आभार**

**तालुका चिखली प्रतिनिधी सिद्धार्थ धंदरे :** चिखली नगर परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचाराला आज प्रभाग 10 मध्ये अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांच्या नेतृत्वात भाजपाची प्रचार रॅली काढण्यात आली. सुरुवातीला साध्या रॅलीच्या रूपात सुरू झालेली ही मोहीम, नागरिकांच्या प्रचंड सहभागामुळे क्षणोक्षणी विस्तारत जाऊन महारॅलीत परिवर्तित झाली. चिखली मध्ये निघालेल्या या रॅलीला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून विरोधकांचे धाबे दणाणले असून चिखली मध्ये नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पंडित दादा देशमुख व नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार भाजपाचे निवडून येतील अशी सर्वत्र चर्चा सुरू आहे.

रॅलीची सुरुवात भगवान बुद्ध, संत व महापुरुषांच्या प्रतिमांना वंदन करून



करण्यात आली. पुढे सरकत असताना घराघरातून नागरिक, माताभगिनी मोठ्या संख्येने सहभागी होत राहिले आणि प्रभाग 10 चा संपूर्ण परिसर घोषणांनी, उत्साहाने दुमदुमून गेला.या महारॅलीत भाजपाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार मा. श्री. पंडितदादा देशमुख, तसेच नगरसेवक पदाच्या उमेदवार सौ. रेणुका भुतेकर आणि श्री. भारत पवार यांच्या प्रचारार्थ नागरिकांनी ठिकठिकाणी स्वागत करून उत्स्फूर्त साथ दिली.चिखलीच्या परिपूर्ण विकासासाठी भाजपाच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन रॅलीतून करण्यात आले. भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने या रॅलीत सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना आमदार सौ. श्वेता महाले पाटील म्हणाल्या,"पंडित दादा देशमुख हे सर्वसामान्यांमध्ये मिसळणारे, मनमोकळे आणि मोठ्या मनाचे जननेते आहेत. त्यांच्या नेतृत्वात चिखली नगरपरिषद भाजपामय करा आणि तुम्हाला विकासाचा मोठा झंझावात अनुभवायला मिळेल. नागरिकांनी भारतीय जनता पक्षावर विश्वास टाकून सर्व उमेदवारांना भरघोस मताधिक्याने विजयी करावे."प्रभाग 10 मधील आजची महारॅली पाहता, आगामी निवडणुकीत मतदार केवळ भाजपासोबत असल्याचा स्पष्ट संदेश मिळाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे....

## नैसर्गिक व अस्मानी संकटामुळे मच्छीमारांवर आर्थिक संकट

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : राज्यातील मच्छीमारांवर सध्या नैसर्गिक आपत्ती हवामान बदल मत्स्यसंपदेत घट आणि सरकारी मदतीत विलंब अशा अनेक कारणांमुळे मोठे आर्थिक संकट आले आहे. समुद्री वादळे, अवकाळी पाऊस आणि समुद्राच्या पातळीतील वाढ त्यामुळे मासेमारीच्या कामात अडथळे येतात ज्यामुळे लाखो मच्छीमारांचे उत्पन्न घटले आहे. आणि त्यांना कर्जबाजारी व्हावे लागले आहे.

समुद्रातील नैसर्गिक समतोल बिघडल्यामुळे मासळीची उपलब्धता ही कमी झाली आहे त्यामुळे मच्छीमारांचे उत्पन्नही घटले आहे



.त्याचप्रमाणे बेकायदेशीर मासेमारी पद्धती, आणि परराज्यातील मोठ्या बोटीमुळे पारंपरिक मच्छीमारांचेही नुकसान होत आहे

२०२५फेब्रुवारी पासून डिझेल परतावा थकीत असल्यामुळे मच्छीमारांना आर्थिक अडचणी येत आहेत, कर्जाचे हप्ते भरता येत नसल्याने मच्छीमारांवर कर्ज थकीत झाल्याचा दबाव वाढत आहे. या संकटामुळे राज्यातील लाखो मच्छीमारांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. यामुळे त्यांच्या उपजीविकेवर याचा गंभीर परिणाम झाला आहे.

वारंवार हवामानात होणारा बदल तसेच समुद्रातून मानवी हस्तक्षेप जल प्रदूषण त्यामुळे समुद्रातील माशांचा साठा कमी होत चालला आहे मच्छी वर उपजीविका करणाऱ्या लाखो मच्छीमारांना मागील काही वर्षांपासून मासळीच्या दुष्काळाची झुंजावे लागत आहे. परिणामी लाखो मच्छीमारांवर आर्थिक संकट ओढावले आहे.

राज्यातील मुंबई, उपनगर ,ठाणे, पालघर ,रायगड, रत्नागिरी ,सिंधुदुर्ग या सात सागरी जिल्ह्यातील विविध पंचावन्न मच्छीमार संस्थांची फेब्रुवारी ते ऑक्टोबर यांना महिन्यापासून 30 डिझेल परताव्याची 51 कोटीची रक्कम थकित आहे आधीच विविध नैसर्गिक आसमानी संकट डोकं वर काढत आहेत आणि अशा परिस्थितीत डिझेल परताव्याची रक्कम थकवल्यामुळे लाखो मच्छीमारांना आर्थिक टंचाईला सामोरे जावे लागत आहे कोटींच्या कामासाठी व्याजाने पैसे घेण्याची वेळ अनेक मच्छीमारांवर आली आहे.

मच्छीमारांवर आलेल्या नैसर्गिक अस्मानी संपत आपत्तीमुळे व्यवसायावर होणारे परिणाम झालेल्या नुकसानीची मच्छीमारांना शेतकऱ्यांप्रमाणे आर्थिक भरपाई मिळावी अशी मागणी मच्छीमारांकडून करण्यात आली आहे..

## उमरी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 करिता मतदान यंत्र सिल

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर :- रूपेशकुमार ग.श्रीरामवार**

उमरी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 करिता निवडणूकीच्या अनुषंगाने दि 29/11/2025 रोजी आयोजित हुतात्मा दत्तात्रय उत्तरवार सभागृह नविन इमारत तहसिल कार्यालय उमरी येथे निवडणूक निर्णय अधिकारी , सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सौ.मंजुषा भगत, मुख्याधिकारी आशुतोष चिंचाळकर,संजय सोलनकर यांच्या उपस्थितीत उमरी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 करिता मतदान यंत्र सिल करण्यात आल्याची माहिती दिली. यावेळी उपस्थित उमरी नगर परिषदेचे नगराध्यक्ष , नगरसेवक पदाचे उमेदवार तसेच सर्व पक्षीय






व अपक्ष उमेदवार, पोलीस अधिकारी, पत्रकार बांधव यावेळी उपस्थित होते..

## महापरिवारनिर्वाण दिनानिमित्त स्वाभिमानी पक्षातर्फे भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्व भीम भक्तांना भोजनदानाचे होणार वाटप –रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वर्ताहर)** : स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकन पक्षातर्फे सहा डिसेंबर रोजी दरवर्षी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिवारनिर्वाण दिन चैत्यभूमी दादर येथे संपन्न होतो स्वाभिमानी पक्षातर्फे भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्व भीम भक्तांना भोजनदानाचे वाटप केले जाणार असल्याची माहिती रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी दिली . स्वाभिमानी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत मनोज भाई संसारे यांनी आपल्या हयातीत 35 वर्ष हा भोजन लहानाचा कार्यक्रम अविरतपणे चालू ठेवलेला आहे त्यांच्यानंतर त्यांचे बंधू व पक्षाचे सध्याचे अध्यक्ष सागर भाई संसारे हे मी यावर्षी या भोजनदानाचं आयोजन केलेले आहे त्याचप्रमाणे या ठिकाणी पक्षाच्या वतीने मुंबई प्रदेशचे अध्यक्ष अमित हिरवे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभेचे आयोजन केलेले आहे हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरता पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष अरुण धिवर,अशोक जी वाघमारे , भगवान गरुड , महाराष्ट्राचे सहसचिव अरुण जाधव, मुंबई प्रदेश महिला आघाडी अध्यक्षा जॉय भोसले त्याचप्रमाणे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे , विजय पवार, पनवेल नगर अध्यक्ष निलेश कांबळे, श्रीवर्धन तालुका अध्यक्ष सुयोग लोखंडे,ममताज पठाण, समाधान कांबळे , चंद्रकांत वेळासकर ,जावेद मास्टर ,दिलीप नाईक ,विनोद धावारे ,समाधान कांबळे, नरेश परदेशी,मयुर गायकवाड, सुमन पाटील इत्यादी कार्यकर्ते या कार्यक्रमाला चैत्यभूमीवर आपल्या सहकाऱ्यांसमोर उपस्थित राहणार आहेत .

## सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृतमहोत्सवानिमित्त जिल्हास्तरीय भरतनाट्यम स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयात संस्थेचे कार्याध्यक्ष, लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या अमृतमहोत्सवानिमित्त आज (दि.२९) सांस्कृतिक समितीतर्फे जिल्हास्तरीय भरतनाट्यम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. भरतनाट्यम हा आपला सांस्कृतिक वारसा व अभिव्यक्ती यांचे प्रतीक असलेला नृत्य प्रकार आहे. भारताच्या नृत्य कलेचा तो एक महत्त्वाचा भाग आहे . या भरतनाट्यम स्पर्धेसाठी संस्थेचे कार्याध्यक्ष लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय टी देशमुख, संस्थेचे संचालक मंडळ सदस्य स्वप्नील ठाकूर,संकुलातील मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे,मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण,उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, ,इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका



नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, अजित सोनवणे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, स्वाती पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत आसपासच्या शाळा व महाविद्यालयातील एकूण २७ स्पर्धक विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्वक सहभाग घेऊन आपल्या भरतनाट्यम या नृत्यकलेचे अप्रतिम सादरीकरण केले .नृत्य कलेचे तंत्र, अभिव्यक्ती, ताल, रंगमंचावरील प्रस्तुती या गुणांच्या आधारे भरतनाट्यम स्पर्धेचे उत्कृष्ट परीक्षण शिवानी पाचरकर आणि ग्रीष्मा करिया या दोन्ही परीक्षकांनी केले.

स्पर्धेत सर्व स्पर्धकांचे भरतनाट्यम नृत्य अतिशय उल्लेखनीय होते. या स्पर्धेतून सई कदम, इ.११वी कॉमर्स(सी के टी उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल ) हिने प्रथम क्रमांक, रेश्मा श्रीसेंथिल कुमार,इ. ९ वी (लोकनेते रामशेठ ठाकूर सीबीएससी स्कूल कामोठे) हिने द्वितीय क्रमांक तर अनन्या गडेपल्ली इ.१०वी (डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल) हिने तृतीय क्रमांक पटकावला. मान्यवरांच्या हस्ते या तीनही विजेत्या स्पर्धकांचा रोख बक्षीस रक्कम, ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांनी उत्कृष्ट प्रदर्शन केल्याबद्दल त्यांचाही सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. वाणिज्य विभाग सहशिक्षिका योगिता जोरी यांनी स्पर्धेचे सुंदर सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास उपस्थित सर्व स्पर्धक विद्यार्थी , शिक्षक, सांस्कृतिक समिती सदस्य, परीक्षक व मान्यवर यांचे आभार व्यक्त करून सर्वांच्या संयुक्त प्रयत्नाने ही स्पर्धा यशस्वी झाली.

## थोडक्यात

### रिक्षा चालकाला अज्ञात दोघांनी लुटले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** पनवेल शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानाशेजारी एका रिक्षा चालकाला दोघा अज्ञात इसमांनी जबर मारहाण करून लुटल्याने शहर पोलिस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदाना बाहेरील झाडाखाली रिक्षा चालक पंकज गजानन म्हात्रे (वय २२) हे रिक्षा थांबवून मैदानाच्या पूर्वेकडील बाजूला रिक्षातच विश्रांती घेत असताना स्कुटीवरून आलेल्या दोघांनी एका अल्पवयीन मुलास मारझोड केली.रिक्षाच्या मागच्या बाजूला कुणाला तरी मारहाण होत असल्याचे लक्षात येताच पंकज रिक्षातून उतरून त्या दोघांना जाब विचारू लागल्याने हल्लेखोरांनी त्या मुलाला सोडून पंकज म्हात्रे यांच्यावरच प्राणघातक हल्ला चढविला . पिसाळलेल्या त्या दोघा हल्लेखोरांनी लाथा बुक्क्पानी पंकज म्हात्रे यांना मारहाण केली. त्यांचे डोके, गळयावर आणि पाठीवर जखम होईपर्यंत त्यांना मारले. त्यानंतर रिक्षाच्या मागील सीटवर ठेवलेला मोबाईल जबरदस्तीने त्यांनी पळवून नेला. या बाबतची तक्रार त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे .

### थॉमस विद्यालयाजवळ असलेल्या मोकळ्या प्लॉटमध्ये आढळला मृतदेह

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल जवळील विचुंबे गावातील थॉमस विद्यालयाजवळ असलेल्या मोकळया प्लॉटमध्ये एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत .सदर अनोळखी बेवारस पुरुष जातीचे प्रेत वय अंदाजे 40 वर्ष अंगाने किरकोळ, चेहरा उभट, केस व दाढी काळे, नाक सरळ व मोठे, डोळे काळे असून अंगात चौकडा फूल बाहयाचा शर्ट, निळे रंगाची इलेस्टीक अंडरपॅन्ट; निळे रंगाची जिन्स पँट घातलेली आहे . याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक शैलेश भद्रे यांच्याशी संपर्क साधावा

### पनवेल परिसरात आढळला वृद्ध इसमाचा मृतदेह

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल शहर परिसरात एका वृद्ध इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल पोलीस करत आहेत सदर इसमाचे अंदाजे वय ५५ ते ६० वर्षीय , रंग सावळा ,उंची ५ फूट ५ इंच ,चेहरा उभट ,अंगाने मजबूत ,डोक्याचे केस काळे - पांढरे , दाढी मिशीचे केस पांढरे वाढलेले , डाव्या हाताच्या कोपराजवळ जुनाट जखमा असून अंगात काळसर रंगाची फुल पॅन्ट व निळ्या रंगाचा हाफ बाह्याचा टीशर्ट व पायात निळया रंगाचे शुज घातलेले आहेत . या इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा .

### उमरी पोलिसांचे शहरातून पथसंचलन



**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर :** उमरी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी उमरी पोलिसा च्या वतीने शहरातील मुख्य रस्त्याने पथसंचलन केले. यावेळी मोठया संख्येने पोलिस सहभागी झाले होते.

### आबेदाबी बाबू शेख यांचे निधन



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** शहरातील स्नेहनगर या परिसरातील रहिवासी असलेले माजी नगरसेवक कॉम्रेड शेख बाबू यांच्या पत्नी शेख आबेदाबी वय ७० वर्ष यांचे (दि.२९) शनिवार रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांची नमाजे जनाजा फतेह ईस्लाम या मजीद मध्ये अदा करण्यात आली असून त्यांचा दफनविधी अब्दलशःनगर नगर परिसरातील मोठ्या कब्रस्तान मध्ये करण्यात आला. त्यांच्या पश्चात पती माजी नगरसेवक कॉम्रेड शेख बाबू, ३ मुले व २ मुली, सुना - जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. शेख आबेदाबी या भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे माजी शहर तथा माजी नगरसेवक कॉम्रेड शेख बाबू यांच्या पत्नी तर हॅप्पी टू हेल्थ फाउंडेशनचे अब्दुल रहीम यांच्या आई होत.

# चिमुकलीवरील अत्याचाराच्या विरोधात लासलगाव शहरात जन आक्रोश मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी महेश साळुंके :** लासलगाव मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे केवळ चार वर्षांच्या चिमुकलीवर अमानुष अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्यानंतर राज्यभरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या भयावह घटनेचा तीव्र निषेध करत लासलगाव शहरातील नागरिक, व्यापारी, सामाजिक संस्था आणि विविध राजकीय पक्षांनी शनिवारी (दि. २९) मोठ्या प्रमाणावर जनआक्रोश मोर्चा काढला. शहरात पूर्णपणे कडकडीत बंद पाळण्यात आला असून नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने, व्यापार प्रतिष्ठाने बंद ठेवून मोर्चाला मोठा प्रतिसाद दिला.

**आरोपीला फाशीची शिक्षा द्या**

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात डोंगराळे येथील ४ वर्षीय चिमुकलीवर बलात्कार करून निर्घृण हत्या झालेल्या घटनेच्या निषेधार्थ लासलगाव शहर स्वयंस्पुर्तीने कडकडीत बंद पाळून




**मोर्चात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. शहरासह ग्रामीण भागातील महिला पुरुषांची व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणावर मोर्चात सामील झाले. या मोर्चातील उपस्थितीमुळे रस्त्यांवर जनसागर उसळल्याचे चित्र दिसत होते.न्याय द्या न्याय द्या, चिमुकलीला न्याय द्या तसेच नराधमाला तात्काळ फाशी द्या,अशा घोषणा मोर्चेकऱ्यांनी दिल्या. मोर्चेकऱ्यांच्या हातात चिमुकली हत्येच्या निषेधाचे फलक घेण्यात आले होते. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात केला होता.**

## आरोपीला फाशी देण्याची मागणी

लासलगाव पोलीस ठाण्यापर्यंत जनआक्रोश मोर्चा काढून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली.सकल लासलगाव नागरिकांच्या वतीने करण्यात आलेल्या आवाहनावरून व्यापाऱ्यांनी आपले व्यापारी प्रतिष्ठान स्वयंस्फूर्तीने कडकडीत बंद ठेऊन मोर्चात मोठा सहभाग नोंदवला. येथील एसटी डेपो पासून मोर्चाला सुरुवात झाली.

मुख्य रस्त्यावरून जात असताना चिमुकलीला न्याय मिळाला पाहिजे, आरोपीला फाशी द्या, न्याय मिळेपर्यंत लढा सुरू राहील अशा घोषणां देण्यात आल्या.

महिला, युवक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे यांना विद्यार्थिनींच्या हस्ते निवेदन देण्यात आले.

निवेदनात आरोपीस कठोरात कठोर शिक्षा देऊन फाशीची शिक्षा व्हावी, प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवावे, सरकारी वकील म्हणून ॲड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करावी, पीडित कुटुंबास शासकीय आर्थिक मदत द्यावी, पोलिस अथवा प्रशासनातील कोणतीही निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, पीडित कुटुंबाचे सर्वांगीण पुनर्वसन करावे या मागण्या करण्यात आल्या.

मोर्चामध्ये शहरातील विविध समाज घटक, सामाजिक संस्था, राजकीय नेते, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

## श्री नवनाथ मंदिर पनवेल येथे श्रीदत्त जन्मोत्सव सोहळा होणार संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल येथील श्री नवनाथ मंदिर येथे सालाबादप्रमाणे यंदाही श्रीदत्त जन्मोत्सव सोहळा होणार संपन्न आहे .यानिमित्ताने गुरुवार दि. ०४/१२/२०२५ रोजी संध्या. ५.३० वा. ते ६.३० वा. महाआरती संध्या. ६.३० वा. ते ७.३० वा. महाप्रसादाची वेळ : रात्री ८.०० वा. भजन संध्या रात्री ८.३० वा, गुरु. दि. २७-११-२०२५ श्री नवनाथ भजन हरिपाठ मंडळ, वारदोली गायिकाः प्रतिक्षा मिसाळ, दक्षता मिसाळ, कार्तिकी मिसाळ, भार्गवी मिसाळ मृदंगः श्री. प्रतिक मिसाळ, शुक्र. दि. २८-११-२०२५ आई गावदेवी भजन मंडळ, वेलवली बुवा : ह.भ.प.: भालचंद्र महाराज पाटील, श्री. जितेंद्र पाटील मृदुंगः श्री. सोमनाथ पाटील, श्री. हनुमान पाटील, श्री. पांडुरंग पाटील, श्री. नवनाथ पाटील, श्री. यश पाटील, श्री. तुषार पाटील,शनि. दि. २९-११-२०२५ कुलस्वामिनी प्रासदिक भजन मंडळ, पेठ गायिकाः कुमारी एकता एकनाथ भाग्यवंत, तवलाः श्री. नमीश म्हात्रे, नितळस, मृदुंगः श्री. एकनाथ भाग्यवंत,रवि. दि. ३०-११-२०२५ श्री गजानन भजन मंडळ, धाकटा खांदा (वेळ सायं. ८.०० वा.) बुवा : श्री. दत्तात्रेय नामदेव भगत, मृदुंग श्री. समीर ना. भगत, चालकः श्री. कृष्णा शं. म्हात्रे, श्री. अजित ना. भगत, श्री. हरीभाऊ पु. म्हात्रे, श्री. हनुमान ना. भगत, श्री. गजानन ध. भगत, श्री. रामचंद्र शेळके, श्री महालक्ष्मी प्रासादिक भजन मंडळ (वारणे) कर्जत (वेळ : सायं. ९.०० वा.) बुवाः श्री. गणपत बुवा फुलावरे, मृदुंगः श्री. भरत फुलावरे, चालकः श्री. गोटीराम ठोंबरे, श्री. रामचंद्र फुलावरे, सोम. दि. १-१२-२०२५ श्री विठ्ठल प्रासादिक भजन मंडळ, नावडे गायकः श्री. विकासयुवा खानावकर, श्री. राहुलबुवा पाटील, श्री. अक्षयबुवा खुटारकर, श्री. निलेशयुवा म्हात्रे, पखवाजः श्री. प्रविण पाटील (वाजे), तबलाः श्री. अरुण म्हात्रे, संगित साथ : श्री. शंकरबुवा म्हात्रे, श्री. महेश पाटील, चालक केसरी नाथा पाटील, मंगळ. दि. २-१२-२०२५,श्री गजानन भजन मंडळ, रोडपाली बुवाः श्री. रामचंद्र युवा गायकर, मृदुंगः श्री. सिद्धेश गायकर, साथ संगत: श्री. अभिमन्यू घरत, श्री. निखिल ठाकूर, श्री. राहुल चौधरी, श्री. दिवेश मोरे, चालक: श्री. गजानन पाटील, श्री. शुक्राचार्य ठाकूर, श्री. वसंत पाटील, श्री. संतोष ठाकूर, श्री. भरत गायकर बुध. दि. ३-१२-२०२५ स्वरगंगा प्रासादिक भजनी मंडळ, (निळजे, डोंबिवली) बुवा : दिलखुश बुवा पाटील, पखवाजः श्री गणेश युवा पाटील आणि मंडळी, गुरु. दि. ४-१२-२०२५ जय हनुमान हरिपाठ महिला मंडळ (कोळखे) मृदुंगः श्री. चिरन मुंढे, श्री. राम कोंडीलकर, चालक ह.भ.प. जनाबाई मुंढे आदी कार्यक्रम श्री नवनाथ मंदिर, रेल्वे स्टेशन रोड येथे संपन्न होणार आहेत .

## पाथरी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी यांचे रस्तारोको आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सिद्धांत चिंचाने :** दिनांक 29/11/2025. वार शनिवार रोजी पाथरी तालुक्यातील सर्व ऊस उत्पादक शेतकरी आणि तसेच किसान सभा आणि स्वाभिमानी शेतकरी संघटना यांच्या वतीने पाथरी येथील पोखर्णी फाटा या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यामध्ये शेतकऱ्यांनी आपल्या ऊसाला योग्य भाव देण्यात यावा यासाठी आंदोलन केले .ऊसाला तीन हजार रुपये भाव देण्यात यावा अशा व इतर अनेक मागण्यांसाठी शेतकऱ्यांच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. पश्चिम महाराष्ट्रात एफ.आर.पी पेक्षा जास्त भाव देण्यात येतो तर मराठवाड्यातील शेतकऱ्यांवर का अन्याय केला जातो असाही प्रश्न या आंदोलनात उपस्थित करण्यात आला. कोल्हापूर मधील भोगावती साखर कारखाना यांनी ऊसाला 3353/- रुपये भाव दिला आहे तर मग पाथरी येतील रेणुका शुगर कारखाना का भाव देत नाही असा या वेळी शेतकऱ्यांनी प्रश्न उपस्थित केला.मागील वर्षातील शेतकऱ्यांचे थकबाकी बिल दोनशे रुपये प्रति टनामागील राहिलेले बिल हा कारखाना कधीपर्यंत देईल असे प्रश्न उपस्थित करण्यात आला.साखर आयुक्त याकडे लक्ष देतील का याही प्रश्नावर चर्चा करण्यात आली. परभणी जिल्ह्यामध्ये एकूण सात साखर कारखाने आहेत यांनी शेतकऱ्यांना तीन हजार रुपये प्रति टन असा



भाव द्यावा हे यावेळी आंदोलनात उपस्थित करण्यात आले. सर्व मालांचे भाव वाढत आहेत पण शेतकऱ्यांच्या मालांचे भाव ना सरकार वाढव आहे ना हे भांडवलदारी कारखानदार वाढवत आहेत यावर सर्व शेतकऱ्यांनी रोष व्यक्त केला. शेतकऱ्यांनी फक्त काबाडकष्टच करायचे आणि मलिदा मात्र व्यापाऱ्यांनी खायचा असं कुठपर्यंत सहन करायचा हेही या आंदोलनात प्रश्न विचारण्यात आला. यावेळी पाथरी तील मोठ्या प्रमाणात शेतकरी बांधव एकत्र येऊन हे आंदोलन हाती घेतली होते.यावेळी शेतकरी नेते उपस्थित होते कॉम्रेड दीपक लिपणे. काँग्रेस बळीराम वराडे,सुनील पितळे, बाबा टेकाळे, उमेश देशमुख सर ( किसान सभा राज्य अध्यक्ष )अजय बोराडे ( किसान सभा जिल्हा अध्यक्ष बीड )रंजीत चव्हाण ( तालुका अधक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना. ) किशोर भाऊ इथे ( स्वाभिमानी शेतकरी संघटना ) सय्यद कलीम भाई ( स्वाभिमानी शेतकरी संघटना )पंढरपूर ते सर तसेच पाथरी शहरातील सर्व ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने एकत्रित येऊन आंदोलन हाती घेतली होते .

## दिव्यांग व्यक्तींचा छळ, हिंसाचार किंवा शोषण करणे हा कायद्यान्वये गुन्हा आहे – राजेंद्र लाड

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे :** व्यक्तींचा छळ, हिंसा व शोषणाविरोधात दिव्यांग कल्याण विभागाने राज्यभर एकसमान कार्यपद्धती लागू केली आहे. जिल्हास्तरावर उपविभागीय अधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी यांनी तक्रारींची नोंद घेऊन तातडीने कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. आता दिव्यांग व्यक्तींचा छळ, हिंसाचार किंवा शोषण झाल्यास आरोपींना थेट सहा महिने ते पाच वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. अशी माहिती दिव्यांग हितार्थ शासन मान्य महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड यांनी दिली आहे.दिव्यांग व्यक्ती असुरक्षित आणि इतरांवर अवलंबून असल्याने



अत्याचार आणि हिंसाचाराच्या बळी ठरल्या आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमानुसार, दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या सर्व प्रकारच्या छळ, हिंसाचार आणि शोषणापासून संरक्षण देण्यासाठी उपाययोजना शासन करील. तसेच कलम ७ (१) (अ) नुसार शासन अशा घटनांची दखल घेईल आणि अशा घटनांच्या विरोधात कायदेशीर उपाय उपलब्ध करतील, असा नियम आहे. कार्यकारी

### आरोपींना थेट ६ महिने ते ५ वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद

दंडाधिकाऱ्यांना दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणारा छळ, हिंसाचार आणि शोषणाविरुद्ध प्रतिबंधात्मक आणि संरक्षणात्मक उपाययोजना करण्याचे अधिकार आहेत. सदर कार्यवाहीची प्रक्रिया दिव्यांग व्यक्ती हक्क नियमांतर्गत निश्चित करण्यात आली आहे. शासनाने दिव्यांग व्यक्तींच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा कठोर निर्णय घेतला आहे. दिव्यांग व्यक्तींचा छळ, हिंसाचार, शोषण झाल्यास आरोपींना थेट ६ महिने ते ५ वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

दिव्यांग व्यक्तीविरोधी छळ, हिंसाचार आणि शोषणाच्या घटनांची दखल घेण्यासाठी, कायदेशीर उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून उपविभागीय दंडाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी काम पाहतील. पीडितांना वाचवणे, संरक्षण आणि पुनर्वसन करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे काम सक्षम प्राधिकारी करतील. सदरील निर्णय हा दिव्यांगांना सन्मानाने जगण्याचा हक्क देणारे ऐतिहासिक पाऊल आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ही एकसमान कार्यपद्धती लागू झाल्यामुळे प्रशासकीय जबाबदारी वाढेल आणि दिव्यांगांना तातडीने न्याय मिळेल.दिव्यांगाच्याबाबत घडलेल्या छळ, हिंसाचार यांबाबत तक्रार प्राप्त झाल्यावर सक्षम प्राधिकारी फौजदारी प्रक्रिया संहिताच्या कलम १३३ ते १४३ (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १५२ ते १६२) नुसार त्वरित कार्यवाही करतील. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार अनुपालन न केल्यास भारतीय दंड संहितेच्या, कलम १८८ (भारतीय न्याय संहिता, कलम २२३) नुसार शिक्षेस पात्र असतील.पीडित दिव्यांग व्यक्ती, त्यांचे नातेवाईक, पोलिस किंवा कोणतीही स्वयंसेवी संस्था तक्रार दाखल करू शकते. तक्रार पोलिस ठाण्यात दाखल होताच ती तातडीने जिल्हा किंवा उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे वर्ग केली जाईल. विशेष म्हणजे, दंडाधिकारी स्वतःहूनसुद्धा अशा घटनांची दखल घेऊन कारवाई करू शकतात. असेही शेवटी राजेंद्र लाड यांनी सांगितले आहे.

## शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीला शासना कडून स्थगिती, निवडणुकीच्या तोंडावर हा चुनवी जुमला असल्याचा गोपाल तायडे यांचा आरोप



**दैनिक युवक आधार**

**शेगांव: प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका तोंडावर महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीला 30 जून पर्यंत स्थितगीती दिली आहे. मुळात ही घोषणाच चुकीची आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची धामधूम सुरू झाली आहे.पार्श्वभूमीवर राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. राज्य शासनाचा हा निर्णय फक्त चूनावी जुमाला असल्याच आरोप स्वराज्य पक्षाचे नेते गोपाल तायडे यांनी केले आहे. येणं स्थानिक स्वराज्य स्वस्था च्या निवडणुकीच्या तोंडावर राज्य शासनाने हा निर्णय घेतला असून ग्रामीण क्षेत्रातील मतदारांना तत्परते खुश करण्याचा व त्याचे मते लटनाचा केविलवाणा प्रयत्न आहे. माजी आमदार मा. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली कर्ज माफी करीता आंदोलनही झालं. त्यानंतर राज्य सरकारने पुढच्या 30 जून पर्यंत कर्ज माफी करू असा निर्णय शासनाने घेतला आहे.याकरिता समिती स्थापन करण्याचा निर्णयही घेतला आहे. ही समिती अभ्यास करुन अहवाल देणार आहे. त्या नंतर कर्ज माफी करणार आहे. असा शासना निर्णय घेण्यात आला आहे. असे असताना देखील महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच कर्ज वसुलिला स्तागीतीचा निर्णय घेतला आहे. जर खरोखरच संपूर्ण कर्जमाफी होणार असेल तर मंग वसुली स्तागिती केवळ 30 जूनपर्यंतच का? आणि कर्ज माफीच होणार असेल तर पूनर्गठन करण्याची गरज काय ?स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या तोंडावर घेतलेला हा निर्णय मताच राजकारण. चूनवी जुमला असल्याचा आरोप स्वराज्य पक्षाचे नेते गोपाल तायडे यांनी केला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# बौद्ध धम्म : करुणा, समता आणि वैज्ञानिकतेची जगाला दिलेली अमूल्य देणगी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे विदर्भ प्रमुख**

भारताची आध्यात्मिक आणि तत्त्वज्ञानिक परंपरा अत्यंत समृद्ध आहे. या परंपरेमध्ये बौद्ध धम्म ही एक अनोखी, मानवतावादी आणि विवेकाधिष्ठित विचारप्रणाली आहे. गौतम बुद्धांनी दोन हजार पाचशे वर्षांपूर्वी समाजाला असा मार्ग दिला जो अहिंसा, समता, करुणा, तर्क आणि शांती या सार्वत्रिक मूल्यांवर आधारित आहे. म्हणूनच बौद्ध धम्म आजही जगभरातील कोट्यवधी लोकांना प्रेरणा देत आहे.

**१. गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान — मानवी मूल्यांचे शाश्वत मार्गदर्शन**

गौतम बुद्धांची शिकवण कोणत्याही चमत्कारावर किंवा अंधश्रद्धेवर आधारित नव्हती.त्यांचे तत्त्वज्ञान हे निरीक्षण, अनुभव, विवेक आणि नैतिक आचरण यांवर आधारित स्वयंसिद्ध सत्य होते. त्यांनी शिकवले—करुणा (Compassion), सम्यक विचार (Right Understanding), समता (Equality), अहिंसा (Non-violence), मध्यम मार्ग (Balance in life), स्वावलंबन – "अप्प दीपो भव'' ही शिकवण आजही आधुनिक मानसशास्त्र, समाजशास्त्र आणि शांतताशास्त्रात महत्त्वाची मानली जाते.

**२. बौद्ध धम्माची वैज्ञानिक दृष्टी**

बौद्ध धम्माचा मूलभूत आधार तर्क, अनुभव आणि वास्तव स्वीकारणे हा आहे. म्हणूनच बौद्ध धम्माला जगात Scientific Religion म्हणूनही ओळखले जाते. मन:शास्त्राच्या दृष्टिकोनातून माइंडफुलनेस (Mindfulness) हा बौद्ध धम्माचा पाया आज संपूर्ण जगात मानसिक स्वास्थ्यासाठी वापरला जातो. ध्यान (Meditation) पद्धतीचे परिणाम आज वैज्ञानिक संशोधनातून सिद्ध झाले आहेत. नैतिकतेवर आधारित जीवनपद्धतीमुळे वैयक्तिक आणि सामाजिक शांतता निर्माण होते.

**३. समाजात समता आणि बंधुता निर्माण करणारा धम्म**

भारताच्या इतिहासात बौद्ध धम्माने प्रथमच सर्वांना समानतेचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार आणि मानवी सन्मानाचे स्थान दिले. बुद्धांनी स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरून भिक्षुणी संघाची स्थापना केली—जो त्या काळातील अत्यंत प्रगत आणि क्रांतिकारी निर्णय होता. बौद्ध धम्मात—जातिभेद नाही, वर्णभेद नाही, उच्च-नीचता नाही, दैववाद नाही. येथे प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या कर्मांवर आधारित प्रगती करण्याचा मार्ग दिला आहे.

**४. सम्राट अशोक — मानवतावादी प्रशासनाचे प्रतीक**

कलिंगयुद्धानंतर सम्राट अशोकांनी अहिंसेचा स्वीकार करून बौद्ध धम्माच्या विचारांवर आधारित राज्यकारभार चालवला. त्यांनी आपल्या शिलालेखांद्वारे समाजाला दिलेला संदेश—सर्व धर्मांचा आदर करा, समाजात सौहार्द ठेवा, सर्व जीवांवर दया करा, सत्य आणि नैतिकता पाळा. त्यांनी बौद्ध धम्माचा प्रसार संपूर्ण आशियात केला. आज श्रीलंका, थायलंड, म्यानमार, जपान, चीन, भूतान, व्हिएतनाम आणि इतर अनेक देशांत बौद्ध धम्म राष्ट्रीय मूल्य म्हणून स्वीकारला गेलाय.

**५. बौद्ध धम्म आणि आधुनिक भारत**

आज भारताचा राष्ट्रीय ध्वज तिरंगा व राष्ट्रचिन्हातील अशोक स्तंभ हे बौद्ध वारशाचे प्रतीक आहेत.यातून भारताची बौद्ध परंपरा किती गाढ आहे हे स्पष्ट होते.

**६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर — आधुनिक बौद्ध चळवळीचे प्रणेते**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माचे सखोल अभ्यासानंतर 1956 मध्ये धम्म दीक्षा घेतली.त्यांना बौद्ध धम्मात— समता, नैतिकता, प्रज्ञा, लोकशाही, विज्ञानाधिष्ठित विचार ही मूल्ये सर्वोच्च वाटली.त्यांनी स्पष्ट सांगितले—"बौद्ध धम्म हा जगातील सर्वात तर्कसंगत आणि न्यायाधिष्ठित धर्म आहे."

**७. बौद्ध धम्माची आजच्या काळातील गरज**

आज जगाला आवश्यक आहे— मानसिक शांतता, करुणामय समाज, विवेक, समता, सहिष्णुता, पर्यावरणपूरक जीवन आणि हे सर्व मूल्ये अखंडपणे बौद्ध धम्मात नांदतात. म्हणूनच बौद्ध तत्त्वज्ञान आज प्रत्येकासाठी—व्यक्ती, कुटुंब, समाज आणि राष्ट्र—या सर्व स्तरांवर उपयुक्त आहे.

**निष्कर्ष**

बौद्ध धम्म हा केवळ धर्म नाही—तो जीवन जगण्याची पद्धत, मनाला शांत करणारी अनुभूती आणि समाजाला एकत्र ठेवणारा मानवतावादी मार्ग आहे. तो आहे—करुणेचा धम्म, समतेचा धम्म विवेकाचा धम्म, अहिंसेचा धम्म, शांतीचा धम्म आणि म्हणूनच बौद्ध धम्म आजही तेवढाच शाश्वत, आधुनिक आणि प्रेरणादायी आहे.

**प्राचार्य के आर हुमणे**
**Mob-9922883163.**

## शैक्षणिक सहलींना श्रीवर्धनचा समुद्र ठरतंय पहिली पसंती; विद्यार्थ्यांच्या ज्ञान-अनुभवाला नवी दिशा

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**



**श्रीवर्धन** – कोकणातील रम्य परिसर, नितळ पाणी आणि सुवर्ण वाळू यामुळे श्रीवर्धनचा समुद्र आता शिक्षणक्षेत्रातील संस्थांची पहिली पसंती बनला आहे. राज्यभरातून शाळा-महाविद्यालये आपल्या सहलींसाठी विशेषतः श्रीवर्धनचाच पर्याय निवडताना दिसत आहेत.

नैसर्गिक भूगोल, समुद्र पर्यावरण, समुद्री जीवसृष्टी आणि स्थानिक सांस्कृतिक वारसा यांचा अभ्यास विद्यार्थ्यांना सहज, प्रत्यक्ष अनुभवासह येथे करता येतो. याशिवाय सुरक्षित बीच, स्वच्छ परिसर, आणि पर्यटन व्यवस्थापनातील सुधारणा या सर्व घटकांनी श्रीवर्धनचे आकर्षण आणखी वाढवले आहे.

विद्यार्थ्यांसाठी बीच अॅक्टिव्हिटी, तसेच ऐतिहासिक ठिकाणांची भेट अशा उपक्रमांमुळे ही सहल केवळ मनोरंजनापुरती न राहता ज्ञानवर्धक ठरत आहे.

स्थानिक व्यावसायिक, हॉटेल उद्योग शैक्षणिक सहलींचा वाढता ट्रेंड हा उत्साहवर्धक ठरत असून पर्यटन हंगाम आणखी तेजीत जाण्याची चिन्हे दिसत आहेत.

शैक्षणिक सहलींच्या नकाशावर श्रीवर्धनची भरारी—विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठीही आणि स्थानिक अर्थव्यवस्थेसाठीही सुखद ठरत आहे.

## उरण नगरपरिषद निवडणूक : दुबार मतदारांचा खेळ स्फोटक; हा डाव आम्ही उधळून लावूच" – भावना घाणेकर

**दैनिक युवक आधार**

**उरणशहर प्रतिनिधी सायली साळुंके** : उरणच्या राजकारणात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तुफान गतीने वाढणाऱ्या आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीमध्ये आज मोठा राजकीय स्फोट उरण नगरपरिषदेतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार भावना घाणेकर यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला आणि सत्ताधारी आणि काही सरकारी कर्मचाऱ्यांवर थेट बोट ठेवत दुबार मतदारांच्या कथित रचनेचा पर्दाफाश केला. "मतदारांची चोरी आणि लोकशाहीचे अपहरण करण्याचा हा प्रयत्न आम्ही सहन करणार नाही. पुरावे आमच्याकडे आहेत—कॉल रेकॉर्ड्स, स्क्रीनशॉट्स आणि प्रत्यक्ष संभाषणे. येत्या अधिवेशनात हा संपूर्ण खेळ आपण उघडा करणार असल्याचे



प्रतिपादन त्यानी या पत्रकार परिषदेमध्ये केले.

सौ.घाणेकर पुढे म्हणाल्या की, "उरणचे आमदार स्वतः 5000 मतांनी निवडून आले, हे मान्य. पण त्यांनी 4000 मतांनी नगराध्यक्ष निवडून आणण्याचा दावा करताना मतचोरीच्या आधारावर आत्मविश्वास मिळाला आहे का? असा थेट आरोप त्यांनीकरून मतदारयादीत मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याचे सांगत पत्रकार परिषदेत मांडलेल्या आकडेवारीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.त्या म्हणतात 4210 मतदारांचा पत्ता मतदारयादीत नाही तर1516 दुबार मतदार आढळले, या बाबत त्या म्हणाल्या तक्रार असूनही निवडणूक आयोगाने या अनियमिततेकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनीया वेळी केला. भावना घाणेकर पुढे म्हणाल्या, "लोकशाही पवित्र असते, परंतु काही जणांनी ती मातीमोल केली आहे. सत्ताधारी आणि त्यांच्याशी हातमिळवणी केलेले काही सरकारी कर्मचारी मतदारांची नावे कृत्रिमपणे वाढवणे, फेक आयडी तयार करणे अशा प्रकारच्या खेळी करताना आढळले आहेत. इतकंच नव्हे तर आमदार स्वतः लोकांना सांगतात— 'फेक आयडी देतो, फक्त सकाळी रिकाम्या बूथवर मतदान करून या.'

ही "निवडणूक लोकशाहीची परीक्षा आहे." भावनांताईनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "निवडणूक पारदर्शक व्हावी ही आमची प्राथमिक भूमिका आहे. पण जर गैरप्रकाराचा टक्का वाढत गेला तर आम्हीही सडेतोड उत्तर देऊ. या पत्रकार परिषदेला माजी आमदार मनोहरशेठ भोईर, गटनेते गणेश शिंदे, सामाजिक कार्यकर्ते गोपाळ पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मिलिंद पाडगावकर, मनसेचे युवा नेते सतीश पाटील यांसह महाविकास आघाडीचे अनेक मान्यवर उपस्थित होते.

आरोग्यविषयक सुविधा, शिक्षण आणि कला-क्रीडा विकास, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांना चालना, रोजगार निर्मिती, मूलभूत नागरी सेवांचे सुदृढीकरणयागोष्टी चा समावेश करून आज महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला.

## पनवेल मतदारसंघात महिला सक्षमीकरणाचा मोठा उपक्रम : ४ हजाराहून अधिक महिलांना मिळणार शिलाई व घरघंटी मशीन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल विधानसभा मतदारसंघातील महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याच्या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत घरघंटी व शिलाई मशीन वाटपाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत निवड झालेल्या ४ हजारहून अधिक पात्र लाभार्थींना सोमवार दिनांक ०१ डिसेंबर २०२५ रोजी पासून शिलाई व घरघंटी मशीनचे वाटप करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा खनिकर्म अधिकारी अमर देवेकर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांच्यासह विविध विभागातील अधिकारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येत असलेला हा उपक्रम पनवेल मतदारसंघात घरगुती उद्योगांना नवी दिशा प्रदान करणारा ठरणार आहे. महिलांच्या हाती रोजगाराचे साधन दिल्यास त्यांच्या कुटुंबाच्या उन्नतीपासून समाजाच्या प्रगती पर्यंत मोठा सकारात्मक बदल घडतो. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्या दृष्टिकोनातून संकल्पना प्रत्यक्षात साकार केली. त्यांनी संबंधित प्रशासनाकडे या संदर्भात पाठपुरावा केला. त्या अनुषंगाने प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्हा खनिज विभागाकडून निधी उपलब्ध करून देण्यात आला. हि योजना पारदर्शक पणे करण्यासाठी इच्छुक महिलांकडून घरघंटी किंवा शिलाई मशिन यासाठी महिलांचे अर्ज मागविण्यात आले. आणि त्या अर्जाची व संबंधित कागदपत्रांची शासकीय नियमाने पडताळणी करण्यात आली. त्यामधून निवड झालेल्या पात्र लाभार्थींना त्या वस्तूचे आणि प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येणार आहे. पनवेल मतदारसंघात सुरु होणारा हा उपक्रम महिला उद्योजकतेला बळ देणारा ठरणार आहे. या उपक्रमामुळे पनवेल मतदारसंघातील महिलांच्या आर्थिक प्रगतीला चालना देणारे आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले असून, या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा प्रभावी मार्ग प्रशस्त होत आहे. याचबरोबर पुढील टप्प्यातही हा प्रकल्प राबविण्यात येणार असून, इच्छुक महिलांनी आपली नोंदणी करून आगामी आर्थिक वर्षांत उपलब्ध होणाऱ्या निधीमधून त्यांना लाभ घेता येणार आहे.

## दैव बलवत्तर म्हणून प्रांश बाळाचा जीव वाचला


### प्रांशला वाचविणाऱ्या देवदुत ठरल्या पोर्णिमा व प्रीती गोंधळी

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** "काळ आला होता पण वेळ आली नाही" ही म्हण याप्रसंगी अगदी तंतोतंत या प्रसंगाला जुळणारी आहे एखादयाच्या जीविताला धोका निर्माण करणारी घटना घडली आणि तो त्यातून वाचला तर असे म्हटले जाते की काळ आला होता पण वेळ आली नव्हती.

अशीच घटना गुरुवार दिनांक शुक्रवार २७ नोव्हेंबर रोजी पनवेल तालुक्यातील मोठा खांदा येथे घडली. कुमार प्रांश उमेश दुंदरेकर वय वर्ष २ हा लहान मुलगा खेळताना ३ ऱ्या मजल्यावरून पडून सुदैवाने पत्र्यावर अडकला असताना त्याच्या रडण्याचा आवाज ऐकून पोर्णिमा लक्ष्मण गोंधळी व प्रीती श्रावण गोंधळी धावत गेल्या या महिलांनी त्याला पाहिलं व त्या दोघींनी क्षणाचाही विलंब न करता सुयोग लक्ष्मण





गोंधळी याला त्यांनी वर पाठवले परंतु सुयोग प्रांशच्या जवळ पोहोचेपर्यंत अचानक त्या मुलाचा हात सुटला आणि तो खाली आला. या परिस्थितीत या दोघींनी त्याला ३ मजल्यावरून पडत असताना हातात झेलून घेतला .आणि त्याच्यावर आलेल्या जीवघेण्या प्रसंगातून त्याला बाहेर काढला.

तत्पूर्वी प्रांश पडत असताना त्या दरम्यान त्याच्या डोक्याला थोडं लागलं असल्यामुळे तो सध्या चिरायु हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे आणि सुखरूप आहे. त्या दोघींपैकी या बाळाला सावरत असतानाच झालेल्या झटापटीत एकीचा हात फॅक्चर तर एकीच्या मानेला इजा झाली आहे.

सदरच्या या प्रसंगात देवदुताप्रमाणे धावून आलेल्या पौर्णिमा व प्रीती या दोघींच्या धाडसाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. त्यांनी दाखवलेल्या या धाडसाचे, प्रसंगावधानाचे सर्वत्र कौतुक होत आहे.पोर्णिमा व प्रिती गोंधळी या नात्याने एकमेकींच्या जाऊबाई आहेत.या दोघींचेही आभार मानले जात आहे.

## कल्पनाशक्ती व वैज्ञानिक दृष्टीकोन विज्ञान प्रदर्शनातून विकसित होतो- उदय जाधव

**दैनिक युवक आधार**

**सेलू शिवाजी पवार :** विज्ञानाच्या रोमांचक आणि व्यावहारिक पैलूंचे प्रदर्शन करून विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण करत,त्या विषयात रस निर्माण करण्यात विज्ञान प्रदर्शने सहाय्यभूत ठरतात.तसेच कल्पनाशक्ती व वैज्ञानिक दृष्टीकोन विकसीत करतात असे मत सेलू येथील गटविकास अधिकारी उदय जाधव यांनी व्यक्त केले.

पंचायत समिती व विवेकानंद विद्यालय सेलू आयोजित ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या (ता.२८ नोव्हेंबर) उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.ते पुढे म्हणाले की ,भविष्यातील शास्त्रज्ञ आणि नवोन्मेषकांना विज्ञान प्रदर्शनातून प्रेरणा मिळते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हरिभाऊ चौधरी,गटशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, करुणा कुलकर्णी केंद्रप्रमुख एकनाथ जाधव,मुख्याध्यापकनामदेव एकशिंगे यांची उपस्थिती होती.





शाश्वत शेती,कचरा व्यवस्थापन,प्लास्टिकला पर्याय, हरित ऊर्जा,उदयोन्मुख तंत्रज्ञान, मनोरंजक गणितीय मॉडेलिंग,आरोग्य व स्वच्छता, जलसंवर्धन व व्यवस्थापन आदी विषयावर प्रयोग सादर करण्यात आले. प्राथमिक गटात ५१ तर उच्च माध्यमिक गटात १९ तसेच शिक्षक सादरीकरण प्रयोग ७ सादर करण्यात आले. प्रयोगांचे परीक्षण मिलिंद झमकडे,विलास खरात,योगेश पंडित, राहुल जाधव,सतीश साबळे यांनी केले. तालुका विज्ञान समन्वयक सौ.पद्माकर मॅडम ,विवेकानंद विद्यालयातील शिक्षक व कर्मचारी वर्ग यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय चौधरी ,प्रास्ताविक नामदेव एकशिंगे,विज्ञान प्रदर्शन रुपरेषा अमोल गायकवाड ,आभार अनिल कौसडीकर यांनी मानले.विज्ञान प्रदर्शनासाठी तालुक्यातील केंद्रप्रमुख तसेच मुख्याध्यापक ,मार्गदर्शक शिक्षक तसेच सहभागी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**- पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे विज्ञानाची समज निर्माण व्हावी - गजानन वाघमारे**

विज्ञान प्रदर्शनाचा प्राथमिक उद्देश विद्यार्थ्यांना व्यावहारिक प्रयोग आणि प्रकल्पांद्वारे वैज्ञानिक संकल्पना जागृत करणे आहे. तसेच समस्या निराकरण कौशल्य विकसित करत ,निष्कर्ष क्षमता वृद्धिंगत करणे तसेच संवाद क्षमता ,स्पष्टीकरण कौशल्य विकसित करणे आहे.पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे विज्ञान समजायला हवे असे मत गजानन वाघमारे यांनी व्यक्त केले.

**- प्राथमिक गटात उत्कर्ष विद्यालय तर माध्यमिक गटात नूतन विद्यालय प्रथम**

प्राथमिक गटात कु.श्रेया चव्हाण व अनुष्का गजमल (उत्कर्ष विद्यालय सेलू -प्रथम ) हर्षदीप चव्हाण (प्रिन्स इंग्लिश स्कुल सेलू -द्वितीय ) हर्षदा मोगल व सिद्धी आवटे (नूतन कन्या शाळा सेलू-तृतीय ) माध्यमिक गटात दुर्गा मगर (नूतन विद्यालय -प्रथम ) फैजल अन्सारी -शांताबाई नखाते विद्यालय वालुर - द्वितीय ) स्वरा देशपांडे (नूतन कन्या शाळा -तृतीय )तसेच शिक्षकांनी सादर केलेल्या प्रयोगाप्राथमिक गटात उमेश क्षीरसागर (नूतन विद्यालय -प्रथम ) तर माध्यमिक गटात नारायण चौरे (ज्ञानतीर्थ विद्यालय- प्रथम)

## सिल्लोड शहर पोलीस ठाण्यात अस्वच्छतेचे साम्राज्य: कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:** कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या सिल्लोड शहर पोलीस ठाण्याच्या इमारतीतच मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरले असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पोलीस प्रशासनालाच स्वच्छतेचे गांभीर्य नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. या अस्वच्छतेमुळे पोलीस कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले असून, याकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.सिल्लोड शहर पोलीस ठाण्याची इमारत ही शहरातील मध्यवर्ती ठिकाणी आहे. या इमारतीच्या दर्शनी भागातच कचरा आणि घाण साचलेली आहे. प्लास्टिकच्या पिशव्या, कागदाचे कपटे, खाद्यपदार्थांचे अवशेष आणि इतर टाकाऊ वस्तूंचा ढिगारा इथे नेहमीच पाहायला मिळतो. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे.

या घाणीच्या साम्राज्यामुळे पोलीस ठाण्यात येणाऱ्या नागरिकांनाही नाहक त्रास सहन करावा लागतो. स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण ही प्रत्येक कार्यालयाची गरज असते,



विशेषतः जिथे सार्वजनिक संपर्क मोठ्या प्रमाणात असतो. परंतु, सिल्लोड शहर पोलीस ठाण्यातील ही परिस्थिती पाहता, येथे कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अस्वच्छतेमुळे विविध आजारांचा धोका वाढतो आणि त्याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवरही होतो.

या गंभीर समस्येकडे पोलीस प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन योग्य उपाययोजना करावी, अशी मागणी सिल्लोड शहरातील जागरूक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. पोलीस ठाण्याचे आवार स्वच्छ आणि सुंदर ठेवल्यास एक चांगला संदेश समाजात जाईल आणि पोलिसांबद्दलची प्रतिमा अधिक उज्वल होईल.

# नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-2025

## भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163 प्रमाणे बंदी आदेश जारी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.04 नोव्हेंबर, 2025 रोजीच्या आदेशान्वये राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-2025 जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील नगरपरिषद/नगरपंचायत हद्दीमध्ये मंगळवार दि.02 डिसेंबर 2025 रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. या निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक निकाल जाहिर होईपर्यंत आचारसंहिता अंमलात राहणार असून, निवडणूक खुल्या व निर्भय वातावरणात पार पाडणे तसेच मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क निर्भयपणे बजावता येणे आवश्यक आहे. याकरिता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163 नुसार जिल्ह्यातील (पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात) नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-2025 च्या अनुषंगाने दि.02 डिसेंबर 2025 रोजी होणाऱ्या नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूकीच्या मतदान समाप्तीकरीता निर्धारित केलेल्या वेळेच्या 48 तास अगोदरच्या कालावधीमध्ये खालील कृती करण्यास मनाई जारी केला आहे.

या आदेशात पाच पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास किंवा फिरण्यास मनाई आहे. निवडणूक प्रचार करणे, सार्वजनिक सभा, बैठका घेणे इत्यादी कृतीस मनाई आहे. (तथापी घरोघरी भेटी / प्रचारास मनाई नाही), राजकीय प्रचार करण्याच्या उद्देशाने बल्क मेसेज करण्यास मनाई आहे. ज्या नगरपरिषद/नगरपंचायत हद्दीमध्ये मतदान होणार आहे, तेथे मतदार नसलेले राजकीय कार्यकर्ते / नेते यांना त्या केंद्राच्या 100 मीटर गरपरिषद/नगरपंचायत हद्दीमध्ये थांबण्यास मनाई आहे..

लाउडस्पीकर वापरास मनाई आहे. मतदान परिसरात कोणत्याही व्यक्तीस मोबाईल फोन, वायरलेस किंवा इतर संपर्क साधने घेवून जाण्यास मनाई आहे. (निवडणुकीशी संबंधीत कामाकरिता नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी व सुरक्षेकरीता नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी वगळून). मतदान केंद्राच्या 100 मीटर परिसरात लाउडस्पीकर,मेगाफोन वापरणे, आरडा-ओरड करणे, गोंधळ घालणे, गैरवर्तन करणे इत्यादी कृती करण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या100 मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस शस्त्र घेवून जाण्यास मनाई आहे. (अपवाद -मतदान केंद्राच्या सुरक्षेकरिता नियुक्त केलेले अधिकारी/कर्मचारी, ज्या व्यक्तीस SPG/Z+ दर्जाची सुरक्षा पुरविण्यात आली आहे. अशा व्यक्तीस साध्या वेशात एक सुरक्षा रक्षक शस्त्र लपवलेल्या स्थितीत घेवून जाता येईल). मतदान केंद्राच्या 100 मीटर परिसरात आस्थापना चालू ठेवण्यास मनाई आहे. मतदारांना देण्यात येणारी चिठ्ठी पांढऱ्या कागदावर असावी. त्यावर कोणत्याही उमेदवाराचे नाव, पक्षाचे चिन्ह, पक्षाचे नाव नसावे. मतदान केंद्राच्या परिसरात पक्षाचे कार्यकत्यांचे निवासस्थाने असल्यास त्याठिकाणी प्रचार करणे, बैठका घेणे, मतदानाकरिता जाणाऱ्या मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी कोणतेही कृत्य करण्यास मनाई आहे.

मतदान केंद्राच्या 200 मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस वाहन आणण्यास मनाई आहे. (अपवाद अपंग /वृध्द / आजारी मतदारांना घेवुन येणारी वाहने). मतदान केंद्राच्या 200 मीटर परिसराचे आत राजकीय पक्षांचे/ उमेदवारांचे निवडणूक बुथ लावण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या 200 मीटर बाहेर निवडणूक बुथ लावताना खालील अटींचे पालन करावे. बुथ लावण्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घ्यावी व बुथ लावणेवावत निवडणूक निर्णय अधिकारी यांना आगावू माहिती द्यावी. प्रत्येक बुथवर कमाल एक टेबल, दोन खुर्चा असाव्यात. बुथकरीता लावलेल्या मंडपाचा आकार 10 X 10 फुट पेक्षा जास्त नसावा. प्रचार कालावधी संपल्यानंतर राजकीय पक्ष प्रचाराला भरीव चालना देण्यासाठी, मतदार संघाच्या बाहेरुन पाठीराख्यांना आणण्यासह त्यांच्या समर्थकांची हलवाहलव करतात. ही वस्तुस्थीती लक्षात घेता, प्रचार कालावधी संपल्यानंतर, मतदारसंघात कोणताही प्रचार होऊ नये यासाठी, बाहेरुन आणलेले आहेत व जे त्याच्या / तिच्या मतदारसंघाचे मतदार नाहीत असे राजकीय कार्यकर्ते/पक्ष कार्यकर्ते/ मिरवणुकीतील कार्यकर्ते/प्रचार कार्यकर्ते, इत्यादीना नियमितपणे मतदारसंघामध्ये उपस्थित राहता येणार नाही, कारण प्रचार संपल्यानंतर, त्यांच्या निरंतर उपस्थितीमुळे मुक्त व निष्पक्ष मतदानाचे वातावरण धोक्यात येऊ शकते.

हा मनाई आदेश रायगड जिल्ह्याच्या हद्दीतील (पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात) नगरपरिषद / नगरपंचायत मतदार संघाच्या हद्दीत दि.30 नोव्हेंबर 2025 रोजी सायंकाळी 6.00 वा. पासून ते दि. 02 डिसेंबर 2025 रोजी सायंकाळी 7.00 वा. पर्यंत अंमलात राहील. तसेच या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय संहिता, 2023 चे कलम 223 नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

## मतदान कव्हरेजसाठी 'डिजिटल'ला 'नो एन्ट्री'; जुन्या माध्यमांवरच प्रशासनाचा विश्वास

**दैनिक युवक आधार**

**अमरावती प्रतिनिधी सौरव डांगरकर :** नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकीच्या मतदान आणि मतमोजणीच्या वार्तांकनासाठी माध्यम प्रतिनिधींच्या प्रवेशाबाबत नागपूर जिल्हा माहिती कार्यालयाने (DIO) एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कडक निर्णय जाहीर केला आहे, ज्यामुळे डिजिटल मीडियाला मोठा धक्का बसला आहे.

जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार यांनी स्पष्ट केले आहे की, YouTube चॅनेल, ऑनलाइन वृत्तपत्रे, संकेतस्थळे (Websites) आणि सोशल मीडिया हँडल यांच्या प्रतिनिधींना प्रवेशिका दिल्या जाणार नाहीत. महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार, निवडणूक कव्हरेजची संपूर्ण जबाबदारी केवळ शासनमान्य प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियावरच सोपवण्यात आली आहे.

**निर्णयाचा अर्थ स्पष्ट:**

प्रशासनाने मतदानाच्या आणि मतमोजणीच्या संवेदनशील कामासाठी 'पारंपरिक' आणि 'शासनमान्य' माध्यमांवर विश्वास दाखवत, डिजिटल माध्यमांच्या अनियंत्रित कव्हरेजला पूर्णपणे वगळले आहे.

| माध्यमाचा प्रकार | प्रवेशिका संख्या | टीप |

शासनमान्य दैनिके (अ, ब, क) | २ प्रतिनिधी | साप्ताहिकांसाठी फक्त १ प्रतिनिधी |

| उपग्रह वाहिन्या (टीव्ही) | २ प्रतिनिधी + १ कॅमेरामन | एकूण ३ जणांना प्रवेश |

| डिजिटल मीडिया (YouTube/ वेबसाइट) | शून्य (No Entry) | कोणत्याही प्रकारचा प्रवेश नाही |

**प्रवेशासाठी 'आज'ची डेडलाइन!**

माध्यम समूहांनी प्रवेशपत्र मिळवण्यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत आज, २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत दिली आहे.

आवश्यक कागदपत्रे: संपादक/ब्युरो चिफ यांचे साक्षांकित पत्र, प्रतिनिधींची नावे आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो.

कुठे जमा करावे: जिल्हा माहिती कार्यालयात श्री. अतुल पांडे (माहिती अधिकारी) किंवा श्री. अशोक सोनकुसरे (वरिष्ठ लिपिक) यांच्याकडे.

प्रवेशाचे नियम कडक झाल्यामुळे, निर्धारित वेळेत अर्ज करणे माध्यम प्रतिनिधींसाठी अत्यावश्यक आहे.हा बातमीचा 'युनिक अँगल' आहे: जुन्या माध्यमांचा 'जमाना' परत आल्याचा आणि डिजिटल मीडियाला 'नो एन्ट्री' मिळाल्याचा मुद्दा आकर्षकपणे मांडला आहे.

## सोयगावात आधुनिक शेतीचा नवा अध्याय– ड्रोनद्वारे फवारणीचा अभिनव प्रयोग यशस्वी

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव :-**तंत्रज्ञान आणि शेती यांचा संगम करत सोयगाव शहरातील प्रगतीशील शेतकरी विलासजी बोर्डे यांनी तुरीच्या शेतीमध्ये ड्रोनद्वारे औषध फवारणीचा अभिनव प्रयोग करून परिसरातील शेतकऱ्यांसमोर एक नवा मार्ग उघडला आहे.सोयगाव शहरात हा प्रयोग प्रथमच पाहायला मिळाल्याने बोर्डे यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.गेल्या काही वर्षांपासून मजूर तुटवडा, वाढते मजुरीचे दर,वेळेवर काम न मिळणे यामुळे अनेक शेतकरी त्रस्त आहेत.या पार्श्वभूमीवर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करणे ही काळाची गरज बनली आहे.



या पार्श्वभूमीवर विलास बोर्डे यांनी ड्रोनद्वारे फवारणी करून वेळ, मजुरी आणि औषधाचा अपव्यय मोठ्या प्रमाणात कमी करण्याचा प्रयत्न केला. पारंपरिक फवारणीच्या तुलनेत ड्रोन फवारणी अधिक समतोल, वेगवान आणि परिणामकारक असल्याचे त्यांना अनुभवातून जाणवले.शेतकरी विलास बोर्डे म्हणाले "मजुरांच्या कमतरतेमुळे अनेक वेळा शेतीचे महत्वाचे काम वेळेत होत नाही. ड्रोन तंत्रज्ञानामुळे वेळेची बचत, खर्चात कपात आणि फवारणी अधिक शास्त्रोक्त पद्धतीने होते. भविष्यात शेती अधिक आधुनिक,वैज्ञानिक आणि मशीनरीवर आधारित होणार आहे.

त्यासाठी आपण बदल स्वीकारायला हवा."या उपक्रमामुळे परिसरातील इतर शेतकऱ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून अनेक शेतकरी प्रत्यक्ष पाहणी करून याबाबत माहिती घेत आहेत.

ड्रोन फवारणीमुळे वेळेची बचत,मजूर समस्येवर उपाय,औषधाचे सम प्रमाणात वितरण,खर्चात बचत,पिकांवर कमी दाब असे अनेक फायदे दिसून आल्याने हा प्रयोग भविष्यात इतर शेतकऱ्यांसाठीही मार्गदर्शक ठरणार आहे.

या नव्या प्रयोगामुळे सोयगाव शहरात आधुनिक शेतीचा नवा अध्याय सुरू झाल्याचे चित्र आहे.

## मराठी ग्लोबल चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**पुणे / प्रतिनिधी :** मराठी ग्लोबल चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर–पुणे कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. मराठी उद्योजकांना जागतिक पातळीवर मजबूत व्यासपीठ मिळावे, परदेशातील मराठी समुदायाशी दृढ संबंध जोडले जावेत आणि शासन–उद्योजक यांच्यात समन्वय वाढावा, याबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले.

कार्यक्रमात मराठी ग्लोबल चेंबर ऑफ कॉमर्सचे सेक्रेटरी शिरीष फडतरे यांनी चेंबरच्या कार्याचा, उद्दिष्टांचा परिचय करून दिला. उद्घाटन सोहळा फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया परिसरातील चेंबर कार्यालयात झाला.यावेळी आपल्या भाषणात डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, विधिमंडळातर्फे परदेशातील मराठी मंडळींशी तसेच उद्योजकांशी संवादाचे विविध कार्यक्रम सातत्याने होत असतात. "फक्त संसदीय भेटी किंवा वैधानिक कामांपुरते आमचे दौरे



मर्यादित नसतात. परदेशातील मराठी समुदायाच्या संस्कृती, रोजगार, स्थलांतरितांच्या अडचणी आणि उद्योजकतेच्या संधी यावर आम्ही प्रत्यक्ष चर्चा करतो," असे त्या म्हणाल्या.त्या पुढे म्हणाल्या की, जपान, युरोप, अमेरिका या देशांमध्ये भेटीदरम्यान अनेक महत्त्वपूर्ण निरीक्षणे समोर आली. "इतर राज्यांचे उद्योजक परदेशात सक्रियपणे करार करून सहकार्य वाढवत आहेत. महाराष्ट्रातूनही अशीच चळवळ गतिमान करण्याची गरज आहे. महाराष्ट्रात इनोव्हेटिव्ह प्रोजेक्ट्स मोठ्या प्रमाणावर चालू असतानाही त्यांची माहिती सादर करणारी 'नॉलेज बँक' अद्याप प्रभावीपणे तयार केलेली नाही," असा मुद्दा डॉ. गोऱ्हे यांनी मांडला.स्त्री सुरक्षितता आणि स्थलांतरित महिलांच्या प्रश्नांवर डॉ. गोऱ्हे यांनी विशेष भर दिला. परदेशात काही महिलांचे पासपोर्ट काढून घेणे, भाषेची अडचण, निवासाची समस्या अशा अनेक तक्रारी समोर येतात. "आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांसाठी एक सुरक्षित 'विंडो' निर्माण करण्याबाबत महाराष्ट्र सरकार गंभीर आहे. प्रोटोकॉल विभागात नवीन पदे निर्माण झाली असून लवकरच यावर व्यापक चर्चा होणार आहे," असे त्यांनी नमूद केले.उद्योग–धोरणांच्या अंमलबजावणीबाबत बोलताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, "महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे जे उद्योग विषयक महिला धोरण राबवत आहे. यामुळे महिला उद्योजकांसाठी मोठ्या संधी निर्माण होत आहेत. पर्यटन क्षेत्रालाही उद्योगाचा दर्जा दिल्याने महाराष्ट्र नवीन दिशा मिळवत आहे."परदेशातील तंत्रज्ञान, कचरा व्यवस्थापन, शेतीसंबंधित प्रकल्प, इंडस्ट्री विस्तार, आणि परदेशात स्थायिक झालेल्या मराठी युवा–व्यावसायिकांच्या संधी यावरही त्यांनी प्रकाश टाकला. "परदेशातील अनेक कंपन्या महाराष्ट्रात युनिट्स सुरू करू इच्छितात, पण पायाभूत सुविधांच्या अडचणींमुळे प्रकल्प पुढे जात नाहीत. यावर संयुक्त प्रयत्नांची गरज आहे," असे त्या म्हणाल्या.मराठी संस्कृती, साहित्य आणि भाषेच्या पोहोचविषयी बोलताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, "जगभर मराठी साहित्य संमेलने होतात, परंतु त्यांचे निष्कर्ष, माहिती एकत्रित करून पुढील वाटचालीसाठी देवाणघेवाण होणे आवश्यक आहे. मराठी भाषेची नाळ परदेशातील तरुण पिढीशी मजबूत ठेवण्यासाठी उद्योजक आणि सांस्कृतिक मंडळींनी एकत्रित कृती करणे गरजेचे आहे."शेवटी, ग्लोबल मराठी फोरम्सचे फेडरेशन तयार करून सामूहिक पातळीवर काम करण्याचा प्रस्ताव डॉ. गोऱ्हे यांनी मांडला. "महाराष्ट्र आणि मराठी विश्व जागतिक स्तरावर पुढे जाण्यासाठी सज्ज आहे. त्यासाठी आपली भूमिका मजबूत, सर्वसमावेशक आणि सातत्यपूर्ण असली पाहिजे," असे सांगत त्यांनी सर्व उपस्थितांना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.

## लोणी येथील दत्त मंदिराकडे जाण्यासाठी रस्त्याचे काम

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार प्रतिनिधी :** लोणी येथील दत्त मंदिराकडे जाण्यासाठी रस्त्याचे काम सरपंच किसन देव बडे यांनी स्वखर्चातून केलेले आहे. गुरुवार दिनांक चार रोजी दत्त जयंती असून या जयंतीनिमित्त परिसरातील अनेक भक्त उपस्थित राहत असतात. यावर्षी त्या भक्तांना खडतर रस्त्या जाण्याऐवजी चांगला रस्ता मिळणार आहे.शिरूर कासार तालुक्यातील लोणी येथील लोणी फाट्या जवळील टेकडीवर दत्त मंदिर असून या मंदिराकडे जाण्यासाठी कसलाही रस्ता नव्हता. मंदिराकडे जाण्यासाठी भक्तांना अवघड पायवाटेने जावे लागत होते. ही अडचण लक्षात घेऊन लोणी गावचे सरपंच किसन देव बडे मंदिराकडे जाण्यासाठी स्वखर्चाने रस्त्याचे काम केले आहे. चार डिसेंबर रोजी दत्त जयंती असून या जयंती निमित्त लोणी, मांगेवाडी, शेरेवाडी, बारगजवाडी या परिसरातील भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहत असतात. स्वखर्चाने रस्त्याचे काम केल्यामुळे भक्ताकडून त्यांचे आभार मानले जात आहेत.



## सोयगाव–शेंदुर्णी रस्त्यावरून राजकारण तापले; श्रेयवादाला ऊत – शिवसेना शहरप्रमुख संतोष बोडके यांची प्रतिक्रिया

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-**शेंदुर्णी व श्री भैरोबामहाराज रस्ता हा जीवनवाहिनी मानला जाणारा मुख्य रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत असून या रस्त्यावरून प्रवास करणे ही सर्वसामान्य जनतेसाठी संकटाची घंटा ठरत होती. "रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता" अशी अवस्था झाल्यामुळे अनेक अपघातात नागरिकांना जीव गमवावा लागण्याच्या घटना घडल्या आहेत.या रस्त्याच्या दुरुस्ती आणि डांबरीकरणासाठी सर्व राजकीय पक्षांनी वेळोवेळी आंदोलन, निवेदन,चर्चा तसेच रस्ता रोको आंदोलन करून शासन आणि प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला होता.एक वर्षापूर्वी सर्वपक्षीय स्थानिक नेते आणि ग्रामस्थांनी सोयगाव-शेंदुर्णी बायपासवर मोठे आंदोलन करून संबंधित



अधिकाऱ्यांकडून लेखी आश्वासनही मिळवले होते की मार्च महिन्यापर्यंत काम सुरु करण्यात येईल.मात्र प्रत्यक्षात काम सुरु होण्यासाठी जवळपास वर्षभर विलंब झाला.दरम्यान,गेल्या काही दिवसांत शिवसेना ,दोन्ही काँग्रेस व भाजपकडून पुन्हा आंदोलनाची भूमिका घेण्यात आली आणि लगेचच रस्त्याचे काम सुरु करण्यात आले.त्यानंतर या कामाचे श्रेय कोणाचे? या प्रश्नावर राजकीय वातावरण तापले असून विविध पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरु झाली आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेना शहरप्रमुख संतोष बोडके यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की "या रस्त्याचे काम मंजूर करण्यासाठी माननीय आमदार अब्दुल सत्तार साहेबांनी दोन वर्षांपूर्वीच प्रक्रिया पूर्ण केली होती. ठेकेदार व विभागीय यंत्रणेच्या हलगर्जीपणामुळे काम उशिरा होत होते.आता जे काम सुरू झाले आहे त्याचे श्रेय कोण घेते हा मुद्दा गौण आहे; महत्वाचे म्हणजे रस्ता दर्जेदार आणि वेळेत पूर्ण झाला पाहिजे.लोकांनी त्रास भोगला आहे ते राजकारणासाठी नव्हे तर विकासासाठी," असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच पुढे बोलताना ते म्हणाले "आमची सर्व राजकीय पक्षांना विनंती आहे — श्रेयवाद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येऊन हा रस्ता चांगला,मजबूत आणि कायमस्वरूपी व्हावा यासाठी प्रयत्न करावेत.जनतेच्या कामात राजकारण नको; जनतेच्या प्रश्नासाठी सर्वांचा आवाज एकच असायला हवा."या रस्त्याच्या लांबलेल्या विलंबामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले असून आता नागरिकांची अपेक्षा एकच — "वाद नाही… रस्ता हवा!"

## वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये भव्य फनफेअर उत्सव; सर्जनशीलता, टीमवर्क आणि उत्साहाची पर्वणी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड :** वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल, निफाड येथे शनिवार, दि. २९नोव्हेंबर २०२५ रोजी भव्य फनफेअरचे आयोजन उत्साहात पार पडले. सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर संपूर्ण परिसरात रंगीबेरंगी सजावट, विद्यार्थी-पालकांची गर्दी आणि आनंदी वातावरणाने उत्सवाची रंगत वाढली.विद्यार्थ्यांनी फूड स्टॉल्स, खेळ, हस्तकला वस्तू, वैज्ञानिक खेळणी आदी कल्पक स्टॉल्स उभारून आपल्या सर्जनशीलतेची झलक दाखवली. फक्त 20 रुपयांपर्यंत वस्तू ठेवण्याच्या नियमामुळे विद्यार्थ्यांनी आर्थिक शिस्त,






नियोजन आणि जबाबदारीचे उत्तम प्रदर्शन केले. इयत्ता ४थी ते ९वी या सर्व वर्गांतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.पालकांनी विविध स्टॉल्सला भेट देत विद्यार्थ्यांच्या क्रियात्मक कौशल्याचे कौतुक केले. शाळेचे ट्रस्टी, संचालक, प्राचार्य आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे अभिनंदन केले.फनफेअरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संघभावना, संवादकौशल्य, व्यवहारज्ञान आणि सर्जनशीलतेचा उत्कृष्ट प्रत्यक्ष अनुभव मिळाला. कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## पुढच्या पाच वर्षात पेण शहराचा चेहरामोहरा बदलणार- आ रवीशेठ पाटील

**दैनिक युवक आधार**

**पेण, (वार्ताहर) :** गेल्या पाच दहा वर्षांमध्ये पेण शहरात विविध विकास कामे झाली असून त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, भुंडा पुल, नदी संवर्धन घाट, स्मशानभूमी, कब्रस्तान यासह रस्ते, गटारे यांचीही कामे होत आहेत तर रिंगरोडचे काम पावसामुळे रखडले ते लवकरच सुरू होऊन येत्या पाच वर्षांत शहराच्या विकासात्मक कामांमुळे येथील चेहरामोहरा बदलणार असल्याचे आमदार रवीशेठ पाटील यांनी सांगितले.पेण पालिका निवडणुकीत भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्या माध्यमातून प्रभाग ७ मध्ये उभे असणारे आफ्रिन अखवारे व सुभाष आवास्कर या दोन उमेदवारांसह थेट नगराध्यक्षाकरीता प्रितम पाटील यांच्या प्रचारार्थ



खान मोहल्ला येथे दि. २८ रोजी रात्रीच्या सुमारास कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते.या सभेला खासदार धैर्यशील पाटील, आमदार रवीशेठ पाटील, माजी नगराध्यक्षा व उमेदवार प्रीतम पाटील, माजी जि.प.सदस्य डी.बी.पाटील, राष्ट्रवादी शहराध्यक्ष जितेंद्र ठाकूर, झेन नाईक, मुद्दूशेठ अखवारे आदिंसह मतदार मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.यावेळी त्यांनी अधिक सांगितले की विरोधक नुसत्या विकासाच्या गप्पा मारतात मात्र हे भ्रष्टाचारी लोक यांनी अर्बन बँक बुडविली आणि अनेकांचे संसार उद्धवस्त केले ते कोणत्या तोंडाने मत मागत आहेत आपण अशा विरोधकांना जाब विचारला पाहिजे असे सांगून येणाऱ्या काळात विकासाला अधिक गती देत शहराचा चेहरामोहरा बदललेला दिसणार असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

तर आपल्या कुटुंबातीलच सदस्य म्हणून मी तिसऱ्यांदा नगराध्यक्ष पदाकरीता उभी आहे.या अगोदर सुद्धा आपण मला भरभरून प्रेम दिले तसेच प्रेम याही वेळेला मिळतील गेल्या दहा वर्षात आपण कुठेही विकास कामांसाठी मागे पडलो नाहीत असे मत थेट नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रितम पाटील यांनी मांडले.

# मुरुडचा समुद्र 'हाऊसफुल्ल', पण रेवदंडाचा इतिहास 'हाऊस लॉक'!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** शैक्षणिक सहलींना मुरुडमध्ये जल्लोष, आगरकोट किल्ला मात्र बंगल्यांच्या छायेत अडकला.विद्यार्थ्यांना समुद्र लाटांचा थरार अनुभवता आला… पण इतिहासाची दारे मात्र बंद ! रेवदंडा आगरकोट किल्ल्यातील बेकायदेशीर बांधकामांमुळे प्रवेशबंदी; नागरिकांचा शासनाला थेट सवाल** राज्यातील विविध जिल्ह्यांतून मुरुड तालुक्यात शैक्षणिक सहलींचा अक्षरशः पूर आला आहे. काशीद, नांदगाव, रेवदंडा, आक्षी, किहीम, नागाव, अलिबाग आदी समुद्रकिनाऱ्यांवर शाळकरी मुलांचा जल्लोष पाहायला मिळत आहे. समुद्राच्या लाटांचा थरार अनुभवण्यासाठी विद्यार्थी आणि पर्यटक मोठ्या संख्येने दाखल होत असून संपूर्ण किनारपट्टी 'हाऊसफुल्ल' झाल्याचे चित्र दिसत आहे.ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावरील गर्दी तर शुक्रवारी उच्चांक गाठला. औरंगाबाद, नाशिक, सातारा, पुणे, मुंबई, ठाणे, कल्याण, विरार, डोंबिवली, दहिसर, लातूर, परभणी आदी ठिकाणांहून विद्यार्थी-पर्यटक मोठ्या प्रमाणावर किल्ला पाहण्यासाठी



राजपुरी व खोरा जेटीवर पहाटेपासून रांगेत उभे होते. वाढत्या गर्दीमुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडी झाली, मात्र वाहतूक पोलिसांनी परिस्थिती सुरळीत हाताळली. समुद्री खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी हॉटेलांना चांगलीच मागणी असून पर्यटनामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे. मात्र, या पर्यटन जल्लोषाच्या पार्श्वभूमीवर रेवदंडा आगरकोट किल्ल्याचे चित्र मात्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत धक्कादायक आहे.इतिहासाची दारे विद्यार्थ्यांसाठी बंद!आगरकोट किल्ला बंगल्यांच्या कुंपणात अडकला?**शैक्षणिक सहलींचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना इतिहासाचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा असतो. परंतु रेवदंड्यातील ५०० वर्षांहून अधिक जुना आगरकोट किल्ला विद्यार्थ्यांसाठी ENTRY बंद झाल्याची गंभीर बाब समोर आली आहे."स्थानिकांच्या म्हणण्यानुसार— किल्ल्याच्या भागात नवीन बंगल्यांचे बांधकाम",मोठमोठे स्विमिंग पूल,आणि वाटा बंद करून प्रवेश रोखणे असे प्रकार सुरू आहेत. यामुळे शाळांच्या सहलींना किल्ला पाहताही येत नाही. इतिहास शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे हे मोठे नुकसान असून, "किल्ल्याचा काही भाग खाजगी मालमत्तेसारखा अडवला जातोय" अशी चर्चा जनतेमध्ये जोर धरत आहे.'शासन जागे होणार कधी?' - नागरिकांचा संताप,एकीकडे जंजिरा किल्ल्यावर तुफान गर्दी…आणि दुसरीकडे रेवदंडा आगरकोट किल्ला बंगल्यांच्या सावलीत हरवत चालला आहे, हा तीव्र विरोधाभास नागरिकांना अस्वस्थ करत आहे. *स्थानिकांचा थेट सवाल * "विद्यार्थ्यांना समुद्राचा आनंद मिळतोय, छान;पण इतिहास शिकायला किल्ला बंद का?" पुरातत्व विभाग कुठे आहे?"इतिहास, वारसा, पर्यटन आणि शिक्षण या तिन्ही पातळ्यांवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारी ही परिस्थिती आहे."शासनाने तातडीने तपास करावा इतिहासप्रेमींची मागणी""आगरकोट किल्ल्यावरील बेकायदेशीर बांधकामांची चौकशी" बंद केलेल्या वाटा त्वरित खुल्या करणे"विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलींना किल्ला खुले करणे" किल्ल्याचे संवर्धन करण्यासाठी पुरातत्व विभागाने सक्रिय पावले उचलणे.या मागण्या वेगाने जोर धरत आहेत.*मुरुडचा किनारा राज्यभरातील विद्यार्थ्यांच्या सहलींनी गजबजला आहे…पण रेवदंडाचा आगरकोट इतिहासाच्या ओझ्याखाली नव्हे, तर बंगल्यांच्या भिंतीआड गुदमरतोय.शासनाने तातडीने कारवाई न केल्यास महाराष्ट्राचा इतिहासच विद्यार्थ्यांसाठी 'बंद' होण्याचा धोका!

## माहूरच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत स्वच्छता अभियान

### राष्ट्रसंत द भ प साईनाथ महाराज वसमतकर यांचे सह भाविक भक्तांनी राबविले आयटीआय मध्ये स्वच्छता अभियान

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर :(प्रतिनिधी) सय्यद ईसा :** महाराष्ट्र राज्याचे स्वच्छता दूत तथा ब्रँड अँबेसिडर राष्ट्रसंत दभप साईनाथ महाराज वसमतकर यांच्याकडे महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व आयटीआय मध्ये स्वच्छता अभियान राबवून मार्गदर्शन करण्यासंबंधी आदेश काढल्याने राज्यभरातील आयटीआय मध्ये साईनाथ महाराज वसमतकर हे प्रबोधन आणि मार्गदर्शन करत असून त्या अंतर्गत माहूर शहरातील आयटीआय मध्ये सर्व शिक्षक विद्यार्थी भाविक भक्ता समवेत स्वच्छता अभियान राबवून विद्यार्थ्यांना दि 28 रोजी मार्गदर्शन करण्यात आले राज्याचे स्वच्छता दूत साईनाथ महाराज वसमतकर यांच्याकडून दररोज




वेगवेगळ्या शहरातील आयटीआय मध्ये जाऊन स्वच्छता अभियान सह विद्यार्थ्यांना जीवनात उपयोगी पडणारे मार्गदर्शन करण्यात येत असून दत्त जयंती निमित्त श्री आनंद दत्त धाम आश्रम येथे दत्त नाम सप्ताह निमित्त सात दिवस मुक्कामी असल्याने आनंद दत्तधाम आश्रम येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून त्या अंतर्गत शहरातील आयटीआय मध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन स्वच्छता अभियानाचे महत्त्व आणि शिक्षणाची गोडी शिकण्याच्या मिळालेल्या संधीचे सोने करण्याबाबत मार्गदर्शन केले तसेच आयटीआय माहूर मध्ये सुरू असलेले पेंटर इलेक्ट्रिशियन फिटर ड्रेस मेकिंग कोपा या ट्रेड बद्दलही मार्गदर्शन केले तसेच एम एम व्ही या प्रस्तावित ट्रेड बद्दल शासन दरबारी पाठपुरावा करू असे आश्वासन दिले यावेळी आयटीआय चे प्राचार्य फारुकी ए वासे यांच्या मार्गदर्शनाखाली गटनिदेशिका पोतदार ए एन यांनी सर्व ट्रेड बद्दल माहिती दिली

यावेळी मोठ्या संख्येने भाविक भक्त तसेच आयटीआयचे निदेशक रामटेके ए एल कनिष्ठ लिपिक बुटले पी एल शिल्पनिदेशक डाकोरे एस एस जगदाळे आर के चीरडे एन बी चव्हाण यु डी मानकर व्ही डी महेश मेकलवार सौ रागिणी खडसे सौ कुसुम मेसेकर पवार व्ही के वॉचमन यांचे सह श्री आनंद दत्त धाम आश्रम चे संचालक मंडळ उपस्थित होते कार्यक्रमाचे कार्यक्रमाची प्रस्तावना आणि सूत्रसंचालन शिल्प निदेशक आर के जगदाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्र गटनिदेशिका ए एन पोतदार यांनी मानले

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून केळवणे को.ए.सो. हायस्कूलला 4 CCTV कॅमेराचे सेटअप भेट

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर :** कोएसो हायस्कूल केळवणे या शाळेचा दरवर्षीप्रमाणे होणारा वार्षिक पारितोषिक वितरण आणि स्नेहसंमेलन कार्यक्रम शुक्रवार २८ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी मोठ्या उत्साहाने साजरा झाला. यात विद्यार्थी, शिक्षक, पालक, सर्व ग्रामस्थ आणि सर्व मान्यवर व्यक्तींनी सहभाग घेऊन संपन्न केला.

विशेष म्हणजे ग्रामस्थांच्या मदतीने माजी विद्यार्थी संघटनेद्वारे शाळेसाठी एक इमारत बांधल्यानंतर परत एका नवीन इमारतीचे बांधकाम सुरू करण्यात येत आहे. त्यासाठी पवित्र कार्याला सर्व क्षेत्रातून मदतीचा हात येत आहे. त्यापैकी केळवणे गावातील

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून केळवणे को.ए.सो.हायस्कूलला 4 CCTV कॅमेराचे सेटअप भेट देऊन शाळेला मदतीचा हात दिला आहे. याव्यतिरिक्त केळवणे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून रस्त्यावर बाक बसवणे, शालेय विद्यार्थ्यांना मदत करणे, आरोग्य शिबिर



ठेवणे असे गावात विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात,ऋषिकेश ठाकूर [ म.न.से. शाखा अध्यक्ष केळवणे],आशिष पगडे [ कर्नाळा विभाग अध्यक्ष],साईराज माळी [वाहतुक सेना सरचिटणीस उरण विधानसभा],सुशांत पाटील, अक्षय पाटील, सुधीर म्हात्रे, गजानन पाटील, रोशन मोकळ, चेतन कोळी, राहुल पाटील, सनी म्हात्रे,शिवम म्हात्रे, रोहित पाटील, रमण म्हात्रे, जयेश म्हात्रे, रणजीत पाटील हे सर्व शाखेचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहून शाळा समितीचे सभापती वि.ना.कोळी सर आणि शाळा समिती सदस्य डॉक्टर डी. सी. शिवकर यांच्या हस्ते शाळेसाठी कॅमेरे सुपूर्त केले.

## हिमायतनगर भाजपा नगराध्यक्ष डॉ.वानखेडे यांच्या प्रचारार्थ माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांची सभा विविध विकासाच्या मुद्द्यावर गाजली….

### लाडक्या बहिणीसह नागरिकांचा सभेला उदंड प्रतिसाद….

**दैनिक युवक आधार**

**माधव काईतवाड बोरगडीकर**

**हिमायतनगर /-** हिमायतनगर नगरपंचायत निवडणुकीत माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांची हिमायतनगर शहरातील नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉक्टर राजेंद्र वानखेडे व सर्व भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा संपन्न झाली या सभेला लाडक्या बहिणीसह नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद देत हजारोच्या संख्येने उपस्थित दाखवली होति त्यामुळे उपस्थित मतदारांना आव्हान करताना खासदार अशोकराव चव्हाण यांनी असे सांगितले की विकसित हिमायतनगरच्या विकासासाठी स्वच्छ निर्मळ प्रतिमेचा उमेदवार म्हणून डॉक्टर राजेंद्र वानखेडे यांना निवडून द्या मी शहराचा विकास करून देईल अशी आम्ही त्यांनी यावेळी बोलताना दिली….

याबाबत सविस्तर वृत्त असे कि महाराष्ट्राचे भाग्यविधाते तथा मराठवाड्याचे भूमिपुत्र नांदेड जिल्ह्याचे भारतीय जनता पार्टीचे नेते खासदार अशोकराव चव्हाण यांनी आज दिनांक 28 नोव्हेंबर रोजी हिमायतनगर शहरातील नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉक्टर राजेंद्र वानखेडे यांच्या प्रचारार्थ शहरात जाहीर सभेचे आयोजन केले होते या सभेला मार्गदर्शन



करताना खासदार अशोकराव चव्हाण यांनी लाडक्या बहिणीसह मतदारांना आवाहन केले की स्वछ प्रतिमेचा उमेदवार तुमच्या समोर उभा आहे माय बाप मतदारांनी मला मतदान केल असे समजून हिमायतनगरच्या सर्वांगीण विकासासाठी स्वच्छ व निर्मळ प्रतिमेचा उमेदवार राजेंद्र वानखेडे यांना तुम्ही भरघोस मतदान देऊन निवडून द्या कुठल्याही भूलथापाला बळी न पडता भारतीय जनता पार्टीच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना प्रचंड असा आशीर्वाद देऊन येत्या दोन डिसेंबर रोजी मतदान करा असे आव्हान त्यांनी यावेळी केले व विरोधकांचा कुठलाही समाचार त्यांनी यावेळी घेतला नाही उलट विरोधकांना माझ्यावर टीका केल्याशिवाय झोप येत नाही या भाषेत त्यांनी खोचक उत्तर देत देत भारतीय जनता पार्टी ही एक देशातील सर्वात एक नंबरची व विकास करणारी पार्टी आहे देशासह महाराष्ट्राच्या विकासात भारतीय जनता पार्टीचे मोठे योगदान आहे त्यामुळे हिमायतनगरच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी डॉक्टर राजेंद्र वानखेडे यांनाच निवडून द्या अशी विनंती केली व या कार्यक्रमादरम्यान मागील तीस वर्षापासून शिवसेनेत असलेले निष्ठावंत कार्यकर्ते विलास वानखेडे यांच्या सह असंख्य कार्यकर्त्यांनी माजी मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवसेनेला जय महाराष्ट्र करून भाजपा प्रवेश केला

यावेळी उपस्थित भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष किशोरजी देशमुख, डॉक्टर अंकुश देवसरकर,गिरीश जाधव, भंडारे सर, निवडणूक प्रभारी डॉक्टर सात डोंगरगावकर, हदगाव तालुका अध्यक्ष भागवत देवसरकर, हिमायतनगर तालुका अध्यक्ष गजानन चायल, किशोर रायेवार,गजानन तुप्तेवार, कल्याण सिंग ठाकूर, विपुल दंडेवाड, सोशल मीडिया जिल्हा संयोजक नागेश शिंदे, आशिष सकवान,सुधाकर पाटील, यलप्पा गुंडेवार, सह भारतीय जनता पार्टीचे असंख्य नेते व कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## दुर्गवीर प्रतिष्ठान व ब्लॅक ॲण्ड वीच कंपनीकडून तळा येथील शाळांना स्मार्ट बोर्ड भेट

**दैनिक युवक आधार**

**तळा वार्ताहर :** दुर्गवीर प्रतिष्ठान आणि ब्लॅक ॲण्ड वीच कंपनीच्या वतीने गो. म. वेदक विद्यामंदिर, ज्युनियर कॉलेज तसेच रायगड जिल्हा परिषद शाळा, तळा यांना अत्याधुनिक स्मार्ट बोर्ड भेट देण्यात आले. डिजिटल शिक्षणाच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल विद्यार्थ्यांसाठी मोठी शैक्षणिक उभारी ठरणार आहे.

या कार्यक्रमास तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत रोडे, सचिव श्री. मंगेश देशमुख, ब्लॅक ॲण्ड वीच कंपनीचे सीएसआर कॉर्डिनेटर श्री. वैभव चव्हाण, सीएसआर उपसमिती सदस्य श्री. योगेश उपाध्याय, श्री. अभिजित तापिसे, दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. संतोष हसुरकर, उपाध्यक्ष श्री. रवींद्र रावराणे, सचिव श्री. सागर टक्के, रायगड जिल्हा प्रमुख श्री. रामजी कदम, सदस्य श्री. मंदार गावकर, श्री. विठ्ठल केंबळे, श्री. कृष्णराम धनवी, रा जि प शाळा समितीचे अध्यक्ष श्री भास्कर गोळे,




गो म वेदक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक श्री दिलीप ढाकणे, सौ जामकर मॅम आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी दुर्गवीर प्रतिष्ठान व ब्लॅक ॲण्ड वीच कंपनीचे सर्व पदाधिकारी यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. सीएसआर कॉर्डिनेटर श्री. वैभव चव्हाण यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्मार्ट बोर्डचा शैक्षणिक प्रगतीसाठी अधिकाधिक उपयोग करावा, असे आवाहन केले. दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष हसुरकर, सचिव सागर टक्के, तसेच रामजी कदम यांनी किल्ले संरक्षण, संवर्धन आणि ग्रामीण-डोंगराळ भागातील शाळांना सतत सहकार्य करत असल्याचे सांगितले.

विद्यार्थिनी सई वावेकर हिने आपले मनोगत व्यक्त करून या सुविधेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, तर श्री. सुनील बैकर यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.सचिव मंगेश देशमुख यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट जाळीची मागणी केल्यानंतर श्री. वैभव चव्हाण यांनी त्यासाठी सकारात्मक आश्वासन दिले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या श्री. चंद्रकांत रोडे यांनी दुर्गवीर प्रतिष्ठान व ब्लॅक ॲण्ड वीच कंपनीचे मन:पूर्वक आभार मानले. श्री रोहीत भागवत व विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाचे निवेदन श्री. सुहास वावेकर यांनी केले. यावेळी गो. म. वेदक विद्यामंदिर, ज्युनियर कॉलेज व रा जि प शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

## ग्रामपंचायत मातेरेवाडी द्वारे डास प्रतिबंध धूर फवारणी तर आरोग्य केंद्र व उपकेंद्र द्वारे रुग्ण तपासणी

**दैनिक युवक आधार**

**मातेरेवाडी (दिंडोरी) :** मातेरेवाडी गावातील इंदिरानगर या ठिकाणी गेल्या 15 ते 20 दिवसात पासून चिकनगुणीया व डेंग्यू पेशंट आढळून येत होते. त्यानंतर गावातील तरुण कार्यकर्ते 28 नोव्हेंबर 2025 त्यांनी लगेच ग्रामपंचायत मातेरेवाडी येथे पत्रव्यवहार करून गावात डास प्रतिबंध फॉगिंग धूर करण्याची विनंती केली. त्यानंतर सरपंच श्रीमती सुनिता



पवार व ग्रामविकास अधिकारी श्रीमती राधा पवार मॅडम यांनी तात्काळ नवीन फॉगिंग धूर फवारणी यंत्र मशीनची मागणी करून पूर्ण गावात 29 नोव्हेंबर 2025 रोजी कर्मचारी नामदेव आहेर व दिगंबर वडजे यांनी फॉगिंग मशीन द्वारे फवारणी केली.

त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र वरखेडा येथिल वैद्यकीय अधिकारी यांना पत्रव्यवहार करून रुग्णाची तपासणी चिकनगुणीया व डेंग्यू या रोगावर प्रतिबंध उपयोजना तसेच लक्षणे असलेल्या रुग्णाची तपासणी करण्यासाठी सांगितले असता. त्यांनी लगेच आरोग्य सहाय्यक यांना स्वत: पाठवून सोबत उपस्थित राहून परिसराची पाहणी करून लक्षणे असल्या रुग्णांची रक्ताची तपासणी केली. तसेच उपकेंद्र मातेरेवाडी येथील कर्मचारी यांना रुग्णांवर देखरेख ठेवणे तसेच नवीन रुग्णांची माहिती प्रा. आ. केंद्र वरखेडा येथे कळवावे. असे सूचित केले.